
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २००६
५११९५८



# चंद्रकला

REFBK-0010597
REFBK-0010597

के. नारखेडे

३०५
७४७५४
१।३।७१
२००६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४७५४ दि: ...
क्रमांक २००६ नों: दि: ११।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

# चंद्रकला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५९८

के. नारखेडे
भुसावळ.

REFBK-0010597

☆☆
☆

किंमत २·५०

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणे २.

किंमत दोन रुपये पन्नास नये पैसे

आवृत्ति पहिली : १९३५
आवृत्ति दुसरी : एप्रिल १९५८
( सुधारून वाढविलेली )

प्रिय भाऊंस
( जी. के पाटील यांस )

## के. नारखेडे यांचीं नवीं पुस्तकें

काव्यकलेचें अंतरंग (प्रबंध)
अंजनी (कादंबरी)
शिवार (ग्रामीण काव्य)
आजच्या गोष्टी (बालवाङ्मय)
भाग १-२-३
कालच्या गोष्टी ,,
मोत्यांचा मळा ,,
मधुराणी ,,
चिवचिव ,,
जलवंती ,,
विजय ,,

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठांक | कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| फुलारी | १ | जाशिल का ? | ४५ |
| मनोमुरली | ३ | दर्शनानंद | ४६ |
| भक्तिभाव | ४ | कलहाची मधुरता | ४८ |
| अर्पण | ५ | म्हणून | ५० |
| पूजनोत्सुक | ६ | कुणी पाहील ! | ५१ |
| विठ्ठल | ७ | फुलपांखरूं | ५३ |
| हाक | ८ | मनीषा | ५६ |
| चंचल कृष्ण | ९ | ललाटलेख | ५७ |
| घुमवी कुंजवना | १२ | बघशिल काय वळून ? | ५८ |
| प्रीतिनें...परी | १४ | उन्मत्त भूपतीस | ६० |
| शिकार | १६ | इशारा | ६२ |
| नवयुवती | १९ | मदांधास | ६४ |
| गानदेवतेस | २१ | समर्पण | ६६ |
| मुग्धेस | २३ | दिवाळी | ६७ |
| रूपांतर | २५ | पंख छेदलेल्या पांखरास | ६८ |
| चित्तचोर | २७ | मृत्यूस | ७० |
| रंग पहा आंतला | २९ | वियोगिनी | ७१ |
| अर्पी तनु त्या नरा | ३१ | दयाघना | ७५ |
| सांगतेस का मला ? | ३२ | सांग मला आई | ७६ |
| उघडुन दावूं कसें ? | ३४ | अंधारांतील घाव | ७७ |
| बोलूं दे नयना | ३५ | हृदयवीणा | ७९ |
| लाजली पोर | ३६ | तेव्हां आणि आतां | ८१ |
| कसेंसें आज कां व्हावें ? | ३७ | प्राणसंकटांत | ८२ |
| थांब जरा सुंदरी | ३९ | वंचित | ८३ |
| तुवां बद्ध केलें | ४१ | विसरुनी जातें | ८५ |
| परिहास | ४३ | न कळे कांहीं | ८६ |
| उणीव | ४४ | फेड | ८८ |

| कवितेचें नांव | पृष्ठांक | कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| जगाचा शिक्षक | ८९ | प्रीति | १३२ |
| सौंदर्य व रसिकता | ९१ | सहज मग | १३३ |
| दग्धहृदय | ९२ | तुझें सामर्थ्य | १३५ |
| लोटेल परी काळ असाही | ९४ | मोहिनी | १३६ |
| दृष्टिकोन | ९६ | वाटतें अतांच गेला दुरी | १३७ |
| वेणु वाजेना | ९९ | करपलेल्या कळीस | १३९ |
| आशादेवि | १०० | काळरात | १४१ |
| प्रीतीचा पाश | १०२ | कां रडसी विभ्रमांत ? | १४३ |
| दावा प्रेमनिवास | १०३ | जादुगार | १४५ |
| हृदय भग्न झालें | १०५ | कटु अनुभव | १४६ |
| पांखरास | १०७ | योगिनी | १४७ |
| प्राणविसांवा ( १ ) | १०८ | निर्धार | १४८ |
| प्राणविसांवा ( २ ) | १०९ | घे निशाणा वंदना | १५० |
| प्रथम दर्शन | ११० | गाई रणगीत | १५१ |
| हृदय तुझें खोल | ११२ | हाक | १५३ |
| चुकविसि कां तूं मला ? | ११३ | उडी घेण्यापूर्वी | १५४ |
| पाहूं नको हें असें ! | ११४ | समाधान | १५६ |
| दाव आपुली कळा | ११५ | शेवटचा मुजरा | १५८ |
| ठेव दूर वीणा | ११६ | नवा वेडवाला | १६० |
| साशंक | ११७ | हृदयगीत | १६४ |
| समाश्वासन | ११९ | लपंडाव | १६६ |
| विपर्यास | १२० | रजनीसखी | १६७ |
| सांत्वन | १२१ | धिक् जीवन ! | १६८ |
| विनवणी | १२३ | आळवणी | १७० |
| दावी दिलदारी | १२५ | भांडवलशाही | १७१ |
| याचना | १२८ | कैफ | १७२ |
| कुसुमायुधास | १३० | हा हिंद देश माझा | १७४ |
| जाहलें जीवित सुफलित परी | १३१ | ठावा न सुखाचा वारा | १७५ |
| | | काव्यगंगा | १७६ |

# चंद्रकला

| कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| जगाचा शिक्षक - - | ८९ |
| सौंदर्य व रसिकता - - | ९१ |
| दग्धहृदय - - | ९२ |
| लोटेल परी काळ असाही - | ९४ |
| दृष्टिकोन - - | ९६ |
| वेणु वाजेना - - | ९९ |
| आशादेवि - - | १०० |
| प्रीतीचा पाश - - | १०२ |
| दावा प्रेमनिवास - - | १०३ |
| हृदय भग्न झालें - - | १०५ |
| पांखरास - - | १०७ |
| प्राणविसांवा ( १ ) - | १०८ |
| प्राणविसांवा ( २ ) - | १०९ |
| प्रथम दर्शन - - | ११० |
| हृदय तुझें खोल - - | ११२ |
| चुकविसि कां तूं मला ? - | ११३ |
| पाहूं नको हें असें ! - | ११४ |
| दाव आपुली कळा - | ११५ |
| ठेव दूर वीणा - - | ११६ |
| साशंक - - | ११७ |
| समाश्वासन - - | ११९ |
| विपर्यास - - | १२० |
| सांत्वन - - | १२१ |
| विनवणी - - | १२३ |
| दावी दिलदारी - - | १२५ |
| याचना - - | १२८ |
| कुसुमायुधास - - | १३० |
| जाहलें जीवित सुफलित परी | १३१ |
| प्रीति - - | १३२ |
| सहज मग - - | १३३ |
| तुझें सामर्थ्य - - | १३५ |
| मोहिनी - - | १३६ |
| वाटतें अतांच गेला दुरी - | १३७ |
| करपलेल्या कळीस - - | १३९ |
| काळरात - - | १४१ |
| कां रडसी विभ्रमांत ? - | १४३ |
| जादुगार - - | १४५ |
| कटु अनुभव - - | १४६ |
| योगिनी - - | १४७ |
| निर्धार - - | १४८ |
| घे निशाणा वंदना - - | १५० |
| गाई रणगीत - - | १५१ |
| हाक - - | १५३ |
| उडी घेण्यापूर्वी - - | १५४ |
| समाधान - - | १५६ |
| शेवटचा मुजरा - - | १५८ |
| नवा बंडवाला - - | १६० |
| हृदयगीत - - | १६४ |
| लपंडाव - - | १६६ |
| रजनीसखी - - | १६७ |
| धिक् जीवन ! - - | १६८ |
| आळवणी - - | १७० |
| भांडवलशाही - - | १७१ |
| कैफ - - | १७२ |
| हा हिंद देश माझा - | १७४ |
| ठावा न मुखाचा वारा - | १७४ |
| काव्यगंगा - - | १७६ |

# चंद्रकला

# चंद्रकला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५८८

## फुलारी

वनीं, उद्यानीं, निशिदिनीं फिरून
दऱ्या-खोरीं धुंडुनी माळरान
फुलें वेंचुनि, गुंफुनी पुष्पमाला
फुलारी ये रसिकांस द्यावयाला.

*　　　*　　　*

" मोगऱ्याच्या मृदु धवल रुचिर सान
कळ्या मजसाठीं आणिल्यास कां न ?
मला त्याविण नच रुचे दुजें कांहीं
अन्य पुष्पा सर तयांची न येई. "

" पूर्ण फुललेलें फूल गुलाबाचें
हृदय—देवीला असे द्यावयाचें
हवे देठाला एकतरी पान "
पुष्प तसलें परडींत एकही न.

" फुलें झेंडूचीं मला दे फुलारी,
जरी असलीं तीं गंधहीन सारीं

रंग त्यांचा मोहवी मन्मनाला
घाट सुबकहि तोषवी लोचनांला. ”

“ जरी एकहि तुजजवळ कमळ नाहीं.
फुलारी हें तव नांव व्यर्थ पाही. ”
“ सोनचाफ्याचीं फुलें हवीं मातें ”
परी एकहि परडींत दिसेना तें.

*  *  *

रुचे कोणा सुम पूर्ण विकसलेलें
कळ्यासाठीं सोत्कंठ कुणी झाले
अर्ध विकसित मागतो सुमन कोणी
म्हणे ‘ नच कां ’ कुणि ‘ पुष्पगुच्छ रानीं. ’

*  *  *

कशी सर्वांची कामना पुरावी !
कशी रसिकांची वृत्ति तोषवावी !

तुच्छतेनें पाहून फुलाऱ्याला
किती मुरडोनी रसिकवृंद गेला.

*  *  *

निराशेनें तो परतला घराला—
शारदेचें मंदीर दिसे त्याला,
शिरीं देवीच्या उधळितां फुलांला
हंसे देवि क्षण, तोहि मुदित झाला.

* * *

## मनो-मुरली

घुमवि मनोमुरलीला-कन्हैया,
घुमवि मनोमुरलीला.

हृदय-मुरलि हरि,
क्षुद्र असे तरि
मोहवील सर्वांला-कन्हैया

फुंक मारशिल
सूर उमटतिल
जगा दावितिल लीला-कन्हैया

बोटें फिरतिल
सूर बदलतिल
लाव जरा अधराला-कन्हैया

तुझ्या मनांतिल
बोल दावितिल
स्वत्व नसेच तयांला-कन्हैया

सहज मनोहर
काढुनि सुस्वर
उधळ हरी मोदाला-कन्हैया
घुमवि मनोमुरलीला.

* * *

## भक्तिभाव

निशिदिनीं पाहतों अनंत मी तव रूपें
परि तुला जाणणें, कळलें मज, नच सोपें !

कधिं सुतरल चंचल पवनाहुनि तूं होसी
तव जडता केव्हां अतुल्य जड विश्वासी.
मृदु कुसुमाहुनि कधिं–कोमलतेची मूर्ति
वज्राला भेदिल अशी कधीं तव शक्ति.

तव तेजें दिसतो सत्पथ अज्ञानाला
तूं स्वतः तम कधीं चकविसि विज्ञात्यांला.
विश्वास नाचवी कधिं तव मंजुल गान
हृद्बंध तुटे कधिं ऐकुनि भीषण तान.

तव सुरूप बघुनी मोदा भरतें येई
विक्राळ-रूप कधिं भयकंपित तनु होई.

निशिदिनीं बघुनिही कळे न मज तव रूप
नच कळो ! वाहतों तव पादिं मी हृत्पुष्प.

* * *

# अर्पण

तव पदीं वाहिलें फूल जिवाभावाचें
तें स्वीकारुनि करि सार्थक सद्भावांचें.
नच परिमल त्याचा हृदयां मोहविणारा
नच रूप तया जें वर्षिल तेजोधारा.

मधुकोष नुघडला, नच पुरतें फुललेलें
नच रंग मनोहर, निवतिल बघतां डोळे
गुणहीन चिमुकलें आकर्षिल नच चित्त
सत्प्रेम हृदयिंचें अंतर्हित परि त्यांत.

तुज रुचेल कां तूं, तुडविशील तें पायीं !
हें कळे न कांहीं, शंकाकुल मन होई !

कासया हवा पण विचार हा मज आतां
अर्पिलें तुला तें तुझी त्यावरी सत्ता.

तव पदीं वाहिलें फूल जिवाभावाचें
घे करीं तुडव वा तुझ्याच तें सत्तेचें.

* * *

## पूजनोत्सुक

आणिलीं वेंचुनी पुष्पें पूजेसाठीं
पूजनोत्सुक उभा मी घेउनि तीं हातीं

क्षणभरांत येशिल आशा होती भारी
किति वेळ उभा मी स्वागतार्थ तव, दारीं
पाहतां वाट तव, शिणलीं गात्रें सारीं
नाकळे आपुली कोठें फिरते स्वारी.

पाहुनी मार्ग ये नयनांला अंधारी.
अनिवार वाहतें सतत त्यांतुनी वारी.
तूं पूजा घ्याया येशिल होती भ्रांती
परि आशा लावुनि पुरें फसविलें अंतीं.

मधु-पुष्पें सुकलीं उडून गेला वास
हो नष्ट सुखाशा, झाला जीव हताश.

तळमळतों व्याकुळ आशा विरतां चित्तीं
पूजनोत्सुक उभा फुलें घेउनी हातीं.

* * *

# विव्हल

तव दर्शन-लालस निराश मानस झालें
अति विव्हल झालों, नयनीं अश्रू आले.

फेंकली करांतिल सुकलेली सुम-माला
मीं दूर उधळिलें पूजा-साहित्याला.

उत्साह हृदयिंचा क्षणांत सारा लोपे
तनु धुळींत पडली व्याकुल होउनि तापें

तों उभा राहसी येउनि एकाएकीं
मन बावरलें मुख लज्जेनें मी झाकीं.

नच भान राहिलें तुजला वंदायाचें
सद्भाग्य नसे तव दिव्यमुखा बघण्याचें.

हो विमूढ वृत्ती वदलों नच शब्दासी
क्षण थांबुनिया तूं तसाच वळुनी जासी.

सांपडे श्रेय तों हाय ! हरपलें विरलें !
हो विव्हल मानस नयनीं अश्रू आले.

* * *

## हाक

तूं हाक मारिसी वळुनी वारंवार
खुणविसी यावया उघडुनि अपुलें दार.

ही मधें पसरली घोर दरी विक्राळ
बघ जरा तळाशीं खोल दिसे पाताळ.

करितात तिथें किति काळसर्प फुंफाट
रसरसे तळाशीं कालकूट बघ आंत.

बघ डोकावुनिया काळोख असे दाट
घन तिमिरीं असल्या कशी दिसावी वाट!

हें अंतर मधलें असह्य, सुटला धीर
परि भेटायाची उत्कंठा अनिवार.

हे काळसर्प, विष तीव्र, दरी ही घोर
भिवविती तरी तुज पाहुनि वाटे धीर.

तूं हांक मारिसी वळुनी वारंवार
बघ उडी घेतली टाकुनि तुजवरि भार.

* * *

# चंचल कृष्ण

तूं मूर्तिमंत रे चंचलता
वद, लाभ काय हरि, तुज भजतां.

क्षणांत हससी, क्षणांत रडसी
क्षणीं बावळा कपटी दिससी
क्षणिं दगडाहुनि निर्दय बनसी

क्षणिं विलसे वदनीं कोमलता
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

मोर पिसारा मुकुटीं चंचल
भुरभुरती हे कुरळे कुंतल
भ्रूलतिका तव नयनहि चंचल

कां वेडे व्हावें तुजकारितां ?
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

सदा धांवती पद तव चंचल
सदा नाचती बोटें चंचल
सूर बदलते मुरली चंचल

नच लाभ भरंवसा तव धरितां.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

पळे भरारा वायू चंचल
भिरभिर उडती विहंग चंचल
उड्या मारिती मृग हे चंचल

चांचल्य शिकविलें तूं जगता.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

स्वैर वासरें धांवति चंचल
गाई फिरविति पुच्छें चंचल
मोर नाचती चरणीं चंचल

तूं तद्वृत्तींचा रे जानिता.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

ह्या यमुना-जल-लहरी चंचल
लहरीवरती तरंग चंचल
तृण वाऱ्यावर नाचे चंचल

तुज बघुनी चंचल हो सरिता.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

वृक्षशिरें हीं डुलती चंचल
लता थरकती कोमल चंचल
नाच सुमांचा बघ हा चंचल

रे तूंच तयांचा नाचविता.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

इथें थांबलें जर कां क्षणभरि
वनवशील मज चंचल तूं हरि,
'जातें बाई' मुखें वदे जरि

परि पाय वळेना धरि दृढता.
तूं मूर्तिमंत रे चंचलता.

* * *

# घुमवी कुंजवना

घुमवी कुंजवना — कन्हैया,
वाजवुनी मधु मंजुल मुरली,

नाद मुरलिचा ऐकायाला
धांवत आल्या गोपीबाला
उत्सुकतेनें बघती तुजला
हर्षित करि विमना — कन्हैया

ओढ लाविली तूं जीवाला
तव पदिं वाही हृत्कलिकेला
वाजिव मुरली फुलवायाला–
हरी, प्रीति–सुमना — कन्हैया

सदा करी जी सरिता खळखळ
नाचे, हासे, घाली गोंधळ
परिसाया मुरलीस्वन मंजुल
शांत होइ यमुना — कन्हैया

पुढें कोंवळें हिरवें जरि तृण
क्षुधित धेनु परि बघती न वळुन
मान फिरवुनी कान उभारुन
बघती तव वदना — कन्हैया

सांनिध कमालिनि असुनी मधुकर
गुंजारव नच करी, उभा स्थिर
कसा कटु–स्वनिं गाइल सुचतुर
तुझ्यापुढें सुजना — कन्हैया

जगा क्षणोक्षणीं जीवन देउन
'वारा पडला' हतबल होउन
दिव्यसूर अवकाशीं घुमवुन
जीवन दे पवना — कन्हैया

पान हलेना फूल डुलेना
स्तब्ध तरुलता झाल्या कान्हा
परिसाया तव मुरली–गाना.
डुलवि लता–तरुंना — कन्हैया

बसे तरुवरी स्तब्ध विहगगण
थांबवून कां निज–मधु–गायन ?
ऐकाया मधुतर मुरली–स्वन
उत्सुक किति बघ ना ! — कन्हैया

मुरलीनादें विश्व गुंगवी
क्लेश दुःख हरि, विलया नेई
दिव्यत्वाला नेउनि देई —

स्वर्गरूप भुवना — कन्हैया
घुमवी कुंजवना.

* * *

# प्रीतिनें चुंबिशील तूं परी

( एका अनाथ अबलेवर एक गुंड अत्याचार करणार हें पाहून त्याचा खून करून तिचें रक्षण करणारा अठरा वर्षांचा बंगाली युवक शशिमोहन हे खुनी म्हणून पकडल्यावर कैदेंत असतां स्वतःशींच गात आहे. )

" धांवा धांवा दीन माय ही संकटांत सांपडे
मांग हा "....... कानीं येई रडे.

चरचरलें मन, भान विसरलों, धांव पुढें घेतली,
फळी मीं लाथेनें फोडिली.

कामांध नीच कुणि लगट सतीशीं करी,
उन्मत्त दिसे मज बळें आगळा जरी,
घेतली उडी मीं त्याचे अंगावरी,

' विचारवंता ' दिसेल माझें साहस वेड्यापरी,
परि तुला रुचेल तें श्रीहरी.

धांवुनि येतां खल अंगावर मारुनिया ठोकर
उडविला दूर अंतरावर.

सुरा काढिला त्यानें—क्षणिं मी हिसकुनि घेई करीं,
खुपसला खोल खलाच्या उरीं.

रक्तांत लडवडे, धडपड तडफड करी,
नरकाचा रस्ता क्षणीं पातकी धरी,
सति-रक्षण होतां मोद होय अंतरीं,

मित्र पळाले म्हणुनि मज 'खुनी, पळ जा कोठें तरी,'
मला तूं जवळी घेशिल हरी.

आले धांवुनि डगलेवाले 'दुबळ्यांचे रक्षक,'
जाहले न्यायाचे भक्षक.

बेड्या ठोकुनि हातांमध्यें, पळेल म्हणुनी खुनीं,
वेढिती मजला चौवाजुंनीं.

नेउनी कोंडिलें तुरुंगांत अवसरीं,
नीतीचा पुतळा 'फार्स' करिल क्षणभरी,
न्यायाचा होइल खून न्यायमंदिरीं,

गुन्हेगार मज इथें जगानें जरी ठरविलें हरी,
प्रीतिनें चुंबिशील तूं परी.

पाप-विचार-स्पर्श न माझ्या मनास जरि जाहला
पातकी दिसे 'न्यायदेविला'

अबला-सतित्व-रक्षण. करितां रक्त लागलें करा,
खुनी मी दिसलों या पामरां !

भूपती म्हणतसे डागळला मम कर,
कायदा बोलतो खुनी असे हा नर,
'री' तीच ओढितो 'पायाचा चाकुर'

खुनी म्हणोनी जरी लटकलों देवा, फासावरी
प्रीतिनें चुंबिशील तूं तरी.

* * *

## शिकार

नमवित धरणी पायाखालीं वीर फिरे हा वनीं
श्वापदें पळति जीव घेउनी

बेफिकीर सारखी फिरतसे दृष्टि चहूंबाजुंला
दिसेना शिकार कांहीं तिला

तों समोर जाळी दाट एक पाहुनी
फेकिला सहज शर तिरकमठा खेंचुनी
नागीण चपळ जणुं बिळांत शिरली क्षणीं

भयद गर्जना कानीं येई उसळुनि जाळींतुनी
निघाला मृगेंद्र उल्हासुनी.

शिकार हाताजवळि पाहुनी दोघे चवताळुनी
धांवले, झुंज जुंपली क्षणीं

वीरमणी एक हा असे अन् वनचा राजा दुजा
अद्भुत प्राणघातकी मजा

ये जाळींतुनि तों वनराणी बाहिर
धांवली प्रियाच्या रक्षणार्थ सत्वर
घे झेंप मागुनी वेगें वीरावर

कडकड चावुनि, नरडें फोडुनि, ऊन रक्त प्यावया
उडी घे शिकार साधावया.

शिकार मिळवावया आपुली उदार जीवावर
झुंजती पंचानन–नरवर

बिजलीपरि तलवार चमकली शीर दूर आदळे
भूवरी पंचानन कोसळे

तों सरसर धांवत येउनि वाऱ्यावर
पोटांत शिरुनिया पार निघाला शर
वनराणी पडली मरून भूमीवर

खेळ एक निमिषांत जाहला वीर, विस्मयाकुल
शर-दिशा बघे नजर चंचल.

धनुष्य घेउनि हातामध्यें दूर अंतरावरी
उभी कुणि, दिसे तया सुंदरी

मिळे दृष्टिला दृष्टि, हांसुनी नेत्रबाण फेंकिला
शिकारी स्थळीं विद्ध जाहला

सौंदर्य बघे तो तटस्थ चित्रापरी
क्षणिं भिरभिरत्या ती पळे पांखरापरी
तद्हृदय घेउनी, जीव वांचवी जरी

भिरभिरतें पांखरूं धरी हा चतुर शिकारी खरा
जाहला आज बावळा पुरा.

'रानफुला' चा रंग उडाला, हुरहुर वाटे तिला
गमे आनंद तिचा हरपला

शून्यदृष्टिनें बघे कुठेंतरि, स्तब्ध बसे चंचला
निमाली मुखचंद्राची कळा

"बेगुमान शौर्यें वीरमणी तो लढे"
तें चित्र सदा तिज दिसतें डोळ्यांपुढें
एकटी बसुनि ती मनांत आतां कुढे

शिकार केली कुणी कुणाची, कसें कळावें बरें?
विचारी मनहि जरी बावरे.

* * *

# नव–युवती

गगनांतिल का निखळुनि खालीं तारा पडली ?
उषा–सुंदरी
रूप कां धरी ?
मेघा सोडुनि येई कां ही चमकत बिजली ?

शापित देवी
कुणि वा येई ?
मूर्त रूप कां धरुनि रती ही हांसत बसली ?

कल्पतरूची
कलिका साची
पुरवाया कां भक्त-काम ही येथ पातली ?

तनू गोरटी
नजर चोरटी
खुळा जाहलों सुरूप बघतां वृत्ती चळली

चंचल डोळे
खुपती भाले
हृदय तळमळे, जया क्षणीं ती मोदा उधळी

गुलाब गालीं
नवती घाली
खुडुनी घ्यावे ओठांनीं क्षणीं आस उसळली.

कुंतल काळे
करिती चाळे
पवनलहरिवर, नाच बघुनि मज धुंदी चढली.

अभिमानाचे
हांसे नाचे
उपहासाची छटा परि जरा त्यांत मिसळली.

घनीं विलसते
चपला क्षण ते
कुंदकळ्यांची चुकुनि दिसे तशि धवल आवली

भीति सुर-वरा
म्हणुनि अप्सरा
कुणी जितेंद्रिय फसवाया ये, सजली नटली
गगनांतिल का निखळुनि खालीं तारा पडली?

* * *

## गान–देवतेस

देवते, पुरवी कामना
जग उत्सुक तव
गान–श्रवणा
पुरवी कामना—देवते,

शांत पसरली निशा दिगंतरिं
शांत जाहल्या जललहरी सरिं
तशाच तरुलतिका कांठावरि
प्रशांत समयीं करी गुंजना—देवते,

हळूच सारुनि अभ्रपटाला
गगनरंगभूवर शशि आला
उत्सुक झाल्या तारा बाला
ऐकाया तव देवि, गायना—देवते,

पळतें पाउल पवन थांबवुन
उभा राहिला श्वासहि कोंडुन
परिसाया तव मंजुल गायन
न करि त्याची विफल वासना—देवते,

वाहिल जों तव गाननिर्झरी
लाजतील पिक आम्रतरुवरी
हताभिमाना स्वर्ग–सुंदरी
करितिल तव गायनानुकरणा—देवते,

नाद तुझा अवकाशीं घुमुं दे
विश्वगोल डोलूं दे मोदें
आधी–व्याधी क्षण विसरूं दे
विमुक्त–संसृति करी गे मना—देवते,

पायापुरतें पाही मानव
वातावरणीं दिव्य सूर तव
घुमवुन संदेश सांग अभिनव
हृदयिं उपजवी प्रेमभावना—देवते,

म्हणती देवहि दुर्बल–घातक
बलवंताची जनता सेवक
धनिकांचें जग, न दीनतारक
तूं तरि गाई दीनरंजना—देवते,

कृत्यें काळीं करुनि अनुदिनीं
सडलें अमुचें हृदय आंतुनी
सूरसुधा तव त्यांत ओतुनी
कृष्ण उजळवी अंतःकरणा

पुरवी कामना—देवते,
जग उत्सुक तव
गानश्रवणा
देवते, पुरवी कामना.

* * *

## मुग्धेस

स्वप्नसुखामधिं दंग
मनीं भावाचे तरंग
खुले नजरेंत रंग
गहिरा गे.

डोळे घेती कुठें धांव
खेळतात लपंडाव
बसे हृदयाला घाव
क्षणोक्षणीं.

मधुमासाविण आला
बहार गे गुलबाला,
कोण रंगवी कपोला
चित्रकार ?

तुझ्या लाल गालांवरी
कोण गडे खेळ करी ?
हांसे, नाचे, परोपरी
मौज करी.

लाल कोंवळा अधर
रस-शृंगार-माहेर,
रति-विलास-मंदीर
भासे मना.

आवळितां गे अधर
लाल मखमालीवर
फांके धवल सुंदर
प्रभा गडे,

गुंफोनिया रत्न-माला
कोण दावी वैभवाला ?
मोह पडे नयनांला
पाहोनिया.

कोण उधळी दौलत
करी रत्नांची खैरात ?
कोण फुलवी वसंत
तारुण्याचा ?

तुझी हरणाची चाल
होई शिकारी बेताल
धावे मागें रानोमाळ
सैरावैरा.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... दि: २५/१०/...
... नोंद दि ...

# रूपांतर

रोज माझ्या दृष्टीस पडे बाला
गमे साधें सुम रानचें मनाला.
नसे ठावा तिज बाह्य डामडौल
खुले साध्या वेषांत देहवेल.

आज गेलें बदलून रूप सारें
कळेना कां नव भरे अंगिं वारें
दिसे देहावर आज नवा साज
चढे गहिऱ्या डोळ्यांत नवें तेज.

वर्ण नैसर्गिक जरी केतकीचा
जरी उन्मादक रंग कपोलांचा
तरी लावुनिया रंग ही मुखाला
खुलवि बाला कमनीय चारुतेला.

शिरीं काळा, मृदु, विपुल केशभार
केश-विरचन-कौशल्य दिसे फार
पृष्ठभागीं 'नागीण' कृष्ण लोळे
किती दंशुनि घायाळ युवक केले.

फूल वेणीवर धवल एकलें जें
फणीवरचें जणुं रत्न तें विराजे.
कुड्या कानीं चमकती शुभ्र तेजें
प्रभा गालावर रम्य मधुर साजे.

सुवर्णाचीं कंकणें करीं ल्यालीं
कुंकु लावी कोरून आज भालीं
उरोभागीं लोळते रत्नमाला
तेज रत्नांचें मोहवी मनाला.

*  *  *

काल हिरवळ पाहिली सान जेथें
आज पाहीं उद्यान रम्य तेथें
काल दिसला घन धवल मज नभांत
आज लखलखती वीज दिसे त्यांत.

* * *

# चित्तचोर

नाजुक मोहक कळी कोंवळी
मुग्ध-यौवना दृष्टिस पडली
कुवासना नच मनास शिवली
कलंक–विरहित – चंद्र करी स्मित
बघुनि मना हो आमोद.

दृष्टी खिळली मोहक वदनीं
पाही तिज मी आतुर नयनीं
सात्विकतेची पुतळी बघुनी
भासे चित्ता – दिव्य देवता
गौंतुनि ही ये खालीं.

सौजन्यानें विनीत बाला
एकसारखी बघे पदांला
नयन मिळावा मग नयनांला—
कसा ? मनीषा विफल, निराशा
हृदया व्याकुळ करी क्षण.

तोंच जराशी मान वळवुनी
हळूच पाही तिरक्या नयनीं
डोळ्याला तों डोळा भिडुनी
गालीं हसली, – सुधा सिंचली
हृदयावर कुणि मज वाटे.

सुवर्णाचीं कंकणें करीं ल्यालीं
कुंकु लावी कोरून आज भालीं
उरोभागीं लोळते रत्नमाला
तेज रत्नांचें मोहवी मनाला.

* * *

काल हिरवळ पाहिली सान जेथें
आज पाहीं उद्यान रम्य तेथें
काल दिसला घन धवल मज नभांत
आज लखलखती वीज दिसे त्यांत.

* * *

# चित्तचोर

नाजुक मोहक कळी कोंवळी
मुग्ध-यौवना दृष्टिस पडली
कुवासना नच मनास शिवली
कलंक–विरहित – चंद्र करी स्मित
बघुनि मना हो आमोद.

दृष्टी खिळली मोहक वदनीं
पाही तिज मी आतुर नयनीं
सात्त्विकतेची पुतळी बघुनी
भासे चित्ता – दिव्य देवता
गांतुनि ही ये खालीं.

सौजन्यानें विनीत बाला
एकसारखी बघे पदांला
नयन मिळावा मग नयनांला—
कसा ? मनीषा विफल, निराशा
हृदया व्याकुळ करी क्षण.

तोंच जराशी मान वळवुनी
हळूच पाही तिरक्या नयनीं
डोळ्याला तों डोळा भिडुनी
गालीं हसली, – सुधा सिंचली
हृदयावर कुणि मज वाटे.

भान उरेना मजला कांहीं
एकसारखा पाहत राहीं
सहज बालिका चित्त विमोही
वदनावरती -- वाढत होती
मधुमोहकता क्षणोक्षणीं.

साधी भोळी प्रथम भासली
बघतां बघतां भूल पाडिली
दिवसा नयनीं धूळ टाकली
घाला घालुनि -- हृदया चोरुनी
निघे जावया ती मोदें.

* * *

# रंग पहा आंतला

नवा देश लागला – बालिके,
मुग्धपणा संपला.

रूप–विनय–गुण–विद्या–यौवन
बघुनी येतिल सारे धांवुन
एकहि विटता जरा तयांतुन
वळवितील पावला – बालिके,

तारा जुळल्या, वीणा छेडिल—
मधुर सूर जन, मोहुनि येतिल
एक तार जरि तुटे तयांतिल
फोडितील भोपळा – बालिके,

फूल सुगंधित ताजें सुंदर
बघुनी जन घेतील शिरावर
क्षणें मलिन मग पाय तयावर
त्यजी रसिक–मंडळा – बालिके,

पवनलहरि मृदु तुला नाचविल
नाचशील तूं भान विसराशिल
स्थानच्युत मग करुनी फेकिल
तीच धूळिमधिं तुला – बालिके,

मधु चाखाया मधुकर जमतिल
गातिल, फिरतिल, तूंही भुलशिल
मधु सरतां परि टाकुनि जातिल
विचार करि चांगला—बालिके,

अनुभव तुजला नसे जगाचा
रंग पाहुनी मोहक वरचा
फसशिल, धरशिल कर भलत्याचा
रंग पहा आंतला—बालिके,
नवा देश लागला.

* * *

# अर्पी तनु त्या नरा

रंग पाहुनी खरा — बालिके,
अर्पी तनु त्या नरा

तारुण्याला येइल बहर
चुंबाया जन बघतिल अधर
फिरुन जयांची जाइल नजर
नको तया आसरा — बालिके,

गीति-सूर हें वारें केवळ
कृष्णसर्प किति धांवुनि येतिल,
अर्थ जयाचें हृदय डोलविल
जाण योग्य त्या वरा — बालिके,

गालावरचा रंग न पाहिल
देहाची जो जात न जाणिल
रंग-जाति हृदयाची जाणिल
करिं त्याच्या दे करा — बालिके,

भुलेल जो नच नयनें चंचल
नयना नच परि नयनीं पाहिल
गूढ-भाव जो त्यांतिल जाणिल
धरी तयाच्या करा — बालिके,

ओवाळीं तूं तनू तयावर
हृत्सुम वाही तच्चरणावर
विशंक-हृदयें धरि त्याचा कर
दूर लोटुनी सुरां — बालिके.

* * *

## सांगतेस कां मला ?

कुसुमायुध पातला – बालिके,
शर तुजवर रोंखिला.

मन्मथ-शर तव हृदयीं खुपतां
कोट छातिचा बाले, चळतां
कंपित होइल सर्व तनुलता
कोण सांवरिल तुला ? – बालिके,

कोण शशीविण कमलिनि फुलविल ?
करें स्पर्शुनी शशि तिज हसविल
यौवन-काळि तव अभिनव कोमल
चंद्र कोण गे तिला ? – बालिके,

अथांग सागर पुढें पसरला
लाटा भिडती बघ गगनाला
कोण नांव तव हाकायाला
नावाडी पाहिला ? – बालिके,

रान पुढें बघ भयाण काळें
जिकडे तिकडे कंटक भरले
पथ न, भुलें मन, कोण पाहिलें
कर धरुनी जायला ? – बालिके,

मन्मथ-कळि ही फुलेल कोमल
तीव्र करांनीं रवि ती जाळिल
ढाल जिवाची घालुनि राखिल
कोण नवतिच्या फुला ?— बालिके,

पंचशरानें जखमी होतां
आग भडकुनी सुतनु करपतां
मुक्त कराया चतुर कोणता
धन्वंतरि पाहिला ?— बालिके,

असंख्य तारे दिसले असतिल
ओढ कुणाची हृदया सुविमल ?
जीवन-तारा कोण तयांतिल
सांग तुझा जाहला ?— बालिके,

कुणा पाहुनी गुलाब फुलतिल ?
स्थिरावतिल हे नयनहि चंचल
हर्ष-लहरि तव हृदयीं उठतिल
सांगतेस कां मला — बालिके,
कुसुमायुध पातला.

* * *

## उघडुन दावूं कसें !

उघडुन दावूं कसें ?— हृदय मी
जिवलग कोण असें !

मुखकमलावर दृष्टि ठरेना
नयनांशीं त्या नयन जुळेना
सूर सुराशीं कधीं मिळेना !
मन हो वेडेंपिसें — हृदय मी,

व्यक्त करिल जो गूढ भावना
कळविल त्याला हृदयवेदना
एकहि असला शब्द सुचेना
काय बोलुनी कसें ?— हृदय मी,

शब्द मनोहर केव्हां स्फुरती
हृदयांतुनि जरि उसळी घेती
ओठावर ते सारे अडती
मीच मजवरी रुसें — हृदय मी,

तत्सहवासीं सदा रमावें —
गमे, परी जों त्यानें यावें
बावरून मी त्या चुकवावें
इप्सित सारें फसे — हृदय मी,

आंत पळावें त्याला चुकवुन
कान देउनी श्वासहि कोंडुन
परिसावें मग दाराआडुन
कानांवर ये हंसें — हृदय मी,
उघडुन दावूं कसें ?

* * *

# बोलूं दे नयना

बोल मधुर वचना — बाले,
परिसाया हा जीव भुकेला.

बोल मनोहर तव ऐकाया
धांवत आलों मी ह्या ठायां
कुरवंडिन त्यावरुनी काया
हर्षित करि विमना. — बाले,

हृदयसरीं मधुभाव उसळले
तुषार तव मुखकमलिं विलसले
नयनीं गालीं बिंबित झाले
कां वळविसि वदना ? — बाले,

स्फुरे अधर तव बोलायाला
दंतपंक्तिमधिं अडवुनि त्याला
आवळसी कां ? लाज कशाला ?
बोल सुधा–वचना. — बाले,

बोल बोल तुज म्हणे खुळ्यापरि
सत्प्रीति कधीं वदते कां परि ?
नयनद्वारें हृदय खुलें करि
बोलूं दे नयनां — बाले,
बोल सुधा–वचना.

* * *

## लाजली पोर

लाजली पोर — चढवितां
प्रीति-शृंगार
'भाग्यश्री कां माझी होशिल?
सदनीं कां मम मुदें नांदशिल?
आगमनें तव त्याचें होइल—
स्वर्गमंदीर' — म्हणतांच लाजली पोर.

चमकुन दृष्टी मजवर फिरली
बावरली मीं मृगी पाहिली
तोंच भूवरी खालीं वळली
सुधेची धार — चढवितां प्रीति-शृंगार.

गालावरची फुलली लाली,
मोत्यांचे सर खुलले भालीं
ऊर थरारे, हो वर खालीं
बावरे फार — चढवितां प्रीति-शृंगार.

कुरळे कुंतल उडती भुरभुर
पदर गळे पडला पायावर
फडफड नाचे तो वाऱ्यावर
उठे काहूर — चढवितां प्रीति-शृंगार.

मृदु तनुलतिका कांपे थरथर
मोह अनावर व्हावें तरुवर
झेलुनि घ्यावें कर — शाखेवर
लाजली पोर — चढवितां प्रीति-शृंगार.

* * *

## कसेंसें आज कां व्हावें ?

सकाळीं कायसें ठरलें — हवें तें जुळुनिया आलें
पुजावा गौरिहर आतां — चित्त उत्फुल्ल मम झालें.

मनीं गुंफोन सुखमाला — रमे मी, तोंच तो आला
धरी एका करें हात — दुजानें स्पर्शिलें गाला.

वदे कांहींतरी तोंच — निसटल्यें चकवुनी आल्यें
थरारे ऊर तरि अजुनी — जाहलें अंगही ओलें.

कितीदां लावुनी टक मी — सारखें त्यास पाहावें,
चंचला जाहली दृष्टी — कसेंसें आज कां व्हावें ?

बोललें स्वैर मी त्यासी — म्हणे तो पोर वाचाळ
आज कां शब्द ना उमटे — विरे ओठावरी बोल.

धिटुकली म्हणुनि सर्वांनीं — हंसत मज नांव ठेवावें ?
धैर्य सारें पळालें तें — कसेंसें आज कां व्हावें ?

खेळतां पूर्वि त्यासंगें — वेळ केव्हां कसा जाई !
आज त्याच्या समोरून — पळायाची मला घाई.

कितीदां स्पर्श मज झाला — नसे पर्वा न जाणीव
आजचा स्पर्श ओझरता — परी वेडावला जीव.

थरारे त्या क्षणीं काया — नटे उठतांच रोमांच
मोकळें राज्य तें गेलें — उपजला हृदयिं संकोच.

*  *  *

जया भीती न संकोच — भराऱ्या स्वैर जें मारी
फसे तें पांखरूं जाळीं — घाबरे, बावरे भारी.

नवी वार्ता कळे आज — मना नव होय जाणीव
बावरा कां न मग व्हावा ? — नव-स्पर्शे खुळा जीव.

* * *

# थांब जरा सुंदरी

थांब जरा सुंदरी — सुधाकण
उधळि अभाग्यावरी.

ऐकाया तव बोल सुमंजुल
झालें किति गे हृदय उताविळ,
मधुर-वच-सुधा वर्षी शीतल
व्याकुळ हृदयावरी — सुधाकण,

मूर्तिमंत तूं गान-देवता
एकनिष्ठ मी भक्त लाभतां
पळसी एकहि गीत न गातां
सोड मुग्धता परी, — सुधाकण,

हांस एकदां पाहुनि वरतीं
कुंदकळ्यांची दिसुं दे पंक्ती
हांसव जें जें तुझ्याभोंवतीं
सुधासेक गे करी — सुधाकण,

खालीं बघसी काय हरपलें?
चित्र नखांनीं काढिसि कसलें?
थरथरसी कां काय जाहलें?
होसी कां बावरी? — सुधाकण,

दिसेल नयनीं विशुद्ध अंतर
प्रीतीचा गे अथांग सागर
बघुं दे निरखुनि मज तो क्षणभर
कृपाप्रसादा करी — सुधाकण,

उद्यानीं नव गुलाब फुलला
समोर माझ्या गुलाब खुलला
द्विगुणित शोभा, ठेवुं दे मला
गुलाब गालावरी — सुधाकण,
उधळि अभाग्यावरी ?
थांब जरा सुंदरी.

* * *

# तुवां बद्ध केलें

मनोहंस उल्लंघी जो दिगंतास बाले,
प्रीतिपाश टाकुनि त्याला तुवां बद्ध केलें !

स्वैर मारियेल्या ज्यानें भराऱ्या नभांत
फिरे रमे स्वच्छंदानें सदा जो वनांत
गिरी, दऱ्या, अब्धि जयानें लंघिले क्षणांत
नेत्रबाण मारुनि त्याला तुवां विद्ध केलें.

सरस्तळीं जाई मोत्यें सदा खावयासी
क्षीरसागरीं जो जाई दूध प्यावयासी
नभो-मंडलाला भिडुनी वदे तारकांसी
उपाशीच फिरतो आतां तुझ्या भोंवतालें.

स्वतःच्याच नादानें जो स्वैरगति पळावा
प्रीतिरज्जु बांधुनि पाया खेंचिलें तया त्वां,
एक बिंदुभंवतीं जेंवी भोंवरा फिरावा
आज तुझ्या भवतीं फिरतो तसा तो मराले,

नभीं दिव्य तारा बघुनी जो न मोहिला गे,
अप्सरास अवगणुनी जो पाय घेइ मागें
नागकन्यकांना ज्यानें तुच्छ लेखिलें गे,
तुझ्याकडे धांवे वेगें आज तो सुशीले,

धरातलहि विहरायाला पुरेना जयाला
झटे बलें उल्लंघाया नभोमंडलाला
तोच हृदय–पंजरिं चिमण्या तुझ्या वसायाला

मोदभरें उत्सुक झाला बंधनांत बाले,
प्रीतिपाश टाकुनि त्याला तुवां बद्ध केलें.

* * *

# परिहास

साजे कां कृति वीर-वराला ?
अजाण कां फसवावी बाला ?
धनाढ्य नगरें रिपुचीं लुटुनी
अमित आणिलें धन हिरावुनी,
हृदयधना अबलेच्या बघुनी
लुटावया नरवीरच सजला !
मदांध झाले, अजिंक्य म्हणुनी
जिंकुनि आणी त्यांस खेंचुनी,
तोच वळें ने चित्त ओढुनी
काय यांत पौरुष, मी अबला !
प्रबल वीरही जया लाजती
शीर नमविती वर नच बघती,
उभे करुनि मज त्यानें पुढती
काय लाजवावें ललनेला !
भूपहि ज्याचे दास जाहले
कर जोडुनिया उभे राहिले,
उत्कंठित मन त्याचें झालें
करावया दासी अधनेला !
दृष्टिक्षेपें क्रूरहि वनचर
दीन होउनी कांपति थरथर,
तोच थरारवि अबलेचा उर
नजर भिडवुनी कां नजरेला ?
साजे कां कृति वीर-वराला ?

* * *

## उणीव

'काळी चंद्रकळा हवी मज अतां द्याना गडे, आणुनी'
बोले मारित तीव्र दृक्शर उरीं वीणा-रवें मोहिनी.
नाहीं तों न म्हणे, विरोध लटका दावी न, होता सुधी.
आणी चंद्रकळा सुरेख, नव्हती पेठेंत तैशी दुजी.

देओनी रमणीकरीं परतला, कामांत तो गुंतला.
पाही ना वळवून दृष्टि वसना, हो व्याकुल प्रेमला.
लोपे हास्य क्षणीं तया 'पटकुरा' फेंकून देई दुरी
होई विव्हल ती, उरीं जणु तिच्या लागे विषारी सुरी.

* * * *

ओठांनीं खुडुनी गुलाब मुखिंचा घ्यावा स्पृहा तीव्र ही,
जाई जों पुढती सखी-मुख-विधू आणावया संमुख,
केला गाल पुढें, मुखा न लपवी, लाजे न ते अल्पही,
घेई चुंबन तो, परी अति कडू झालें तयाचें मुख.

* * *

## जाशिल का ?

प्रेमलता नव हृदयिं विकसली
जाशिल का उपटून ?— साजणी,

नवरंगानें हृत्सुम फुललें
जाशिल का चिरडून ? — साजणी,

भाव–सुमें तव पदीं वाहतों
जाशिल का चुकवून ? — साजणी,

दृष्टि मुखीं परि पातें लवतां
जाशिल का तुडवून ? — साजणी,

तव सहवासीं मुदित मन तया
जाशिल का रडवून ? — साजणी,

कटाक्षशर हृदयांत विषारी
जाशिल का खुपसून ? — साजणी,

विद्युल्लतिका घनीं तशी तूं
जाशिल का चमकून ? — साजणी,

सुमशय्या मृदु, तीवर कांटे
जाशिल का पसरून ? — साजणी,
जाशिल का विसरून.

* * *

## दर्शनानंद

येई नाथ गृहीं तयास बघुनी होई सखी हर्षिता
लोपे जी विरहीं सदा दिसतसे चंद्राननीं खिन्नता,
भेटाया बहु उत्सुक क्षण तिला वर्षापरी वाटला
साही वर्ष परंतु, दुःसह घटी ह्या आज होती तिला.

येई जों गजगामिनी प्रियसखी हर्षें मनीं मी खुलें
माझी दृष्टि मृणाल–मोहक–मुखीं स्थीरावली ना चळे,
जों पाही मम दृष्टि, पाय खिळले, लज्जाकुला अंतरीं,
विद्युद्दृष्टि क्षणांत घे वळवुनी पाही पदा सुंदरी.

पाही लावुन सारखी टक मुखीं, पातें न हाले मम,
जादूनें नयनांतल्या चकविलें, होई मना विभ्रम,
कांहीं जों क्षण लोटती, वळवुनी दृष्टि प्रिया चोरटी
पाही तों — वळली पुन्हां महिवरी, रोमांचली गोरटी.

गालीं रंग भरी उषा हळु हळू, हो लोल मन्मानस
पाहोनी फुलते कपोल न चळे, तो मूढ वा तापस.
पाही ती फिरुनी, तशीच दिसली दृष्टी तिला तन्मुखीं
खालीं दृष्टि पुन्हां वळे, थरकली, भांबावली मत्सखी.

“ भालाफेंक करूं नको तव गडे, मच्चित्त वेडावतें
ऐसे कां स्वजनावरीच करिशी आघात हे चोरटे ? ”
टाकी मंद पदें पुढें, हंसत ये, कांहीं मनीं कल्पना,
येओनी पुढती हळू मृदुकरें झाकी सखी लोचना.

जों ठेवी नयनावरी कर, पडे अंधार का ? कोठला !
पाही संमुख मी सखी — मुख तशी दृष्टी तिची चंचला.
लज्जेनें फुलले गुलाब दिसती सुस्पष्ट मल्लोचना
स्पर्शानें नटली दिसे तनुलता, रोमांचली अंगना.

अंधारांत दिसे प्रकाश, उसळे आमोद हृत्सागरीं,
ब्रह्मानंद कुणास ठाउक ! गमे ही हर्षसीमा खरी.
लागे सौख्यसमाधि मी विसरलों विश्वास, माझा मला.
दिव्यानंद – समाधि भंगुनि, गमे, शुद्धी न यावी मला.

* * *

# कलहाची मधुरता

स्वारी कां न अजून ये गृहिं ढळे माथ्याहुनी चंद्रमा !
चिंता-व्याकुल होउनी तळमळे निश्वास सोडी रमा.
लागे चाहुल, वाजतां खट, बघे ती दार उत्कंठुनी,
'नाहीं मी वदणार' निश्चय असा चित्तीं करी मानिनी.

वाजे पाउल आणि नाथ दिसले, बाला मना सांवरी,
रागानें फुगवून गाल बसली ती स्तब्ध चित्रापरी.
नाचे हास्य मुखीं असा सुनिकटीं येई रमेचा सखा,
स्कंधीं ठेवुनि हात, सस्मित बघे हृद्देवतेच्या मुखा.

"जा, कां लौकर पातला ? नच उरे कांहीं दुजें काम का ?
जा, कांहीं उरलें असेल करुनी या, शब्द बोलूं नका."
सारी हात बळेंच, दूर सरके रागावुनी सुंदरी
जाणें अर्थ, परी विनोद करण्या संधी मिळे त्या बरी.

"आज्ञा आजवरी कधीं नच तुझी मीं मोडिली भामिनी,
आज्ञाभंग कसा करीन सजणी, तूं सांगतां निक्षुनी,
जातों, जा म्हणसी म्हणून" वळुनी जाया निघाला युवा,
देखावा उलटून चित्रपट ये रंगीं तयांच्या नवा.

'वेडी मी चुकल्यें क्षमा मज करा' कारुण्यमूर्ती वदे,
'थट्टेनें वदतां अनर्थ असला कां हा करावा गडे ?'

दावी निष्ठुरता गभीर वदनीं, चित्तीं जरी तोषला,
तों गंगायमुना क्षणांत जमल्या साहाय्य द्याया तिला.

जोडोनी कर पादपद्म पतिचें वंदावया वाकतां,
घेई तो उचलोनिया निजकरें, प्रेमें मनोदेवता.
ओठांनीं भरली क्षणीं फिकटशा लाली कपोलीं नवी,
ठेवोनी हृदयावरी मुखकळी, हृद्देश तो भूषवी.

* * *

म्हणून

कां बावरली ही पोर अशी ?
मृदु पवनिं थरारे वेल जशी.

लक्ष न कामाकडे जराही
न सुचे कांहीं, न कळे कांहीं
स्वतांच्याच नादांत उभी ही,
मित-मदिरा-पानीं वृत्ति, तशी.

आवळुनी दृढ कोमल अधर,
फिरुनि फिरुनि सांवरिते पदर,
चोरट्यापरी फिरते नजर,
अज्ञभीत मृगी जणुं पडे फशी.

हाक मारिती सासूबाई
पुन्हां पुन्हां परि ऐकुं न येई,
होई कां बेभान अशी ही ?
स्थिर मंत्रमुग्ध नागीण जशी.

जिन्यावरुनि जंव उतरे रंभा
तोंच कुणी घे साखरचुंबा,
ने खुडुनी अधराच्या बिंबा
साधुनी अचानक वेळ कशी !
म्हणुनि ही बावरे पोर अशी.

* * *

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... ५१
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# कुणी पाहील !

सौख्याचे दिन होउनी परिचिता, झाले न जों फारसे
तों एक्या दिनिं मी बघें सखि, करी बागेमधें कायसें,
संध्याकाळ अतीव रम्य, कुसुमीं उद्यान सारें फुलें,
माझेंही सुम त्यामधीं मिसळलें, त्यांच्यासवें रंगलें.

वाहे मंद समीर शीत, कुसुमें सारींच तो डोलवी,
अस्ताचा तरणी, सुवर्ण किरणीं दे त्या सुकान्ती नवी,
मोही अन्य न पुष्प मन्मन, तदा दृष्टी कपोलीं खिळे
सोनेरी किरणांत तें विकसल्या पद्मापरी भासलें.

वेणी-बंधन सैल, केस उडती वाऱ्यावरी नाचलीं,
कांहीं चोरुनिया मदीय सखिच्या गालांप्रती चुंबिलें.
झालों गुंग, जरा पुढें सरकलों, उन्माद चित्तीं भरे
पाहोनी मज, मत्सखी चमकली रोमांचली बावरे.

दोन्ही हात धरोनिया निजकरीं, प्रेमें सखी घाबरी,—
ओढी सांनिध, आणि गोड वठवी मी चिन्ह गालावरी,
लाजेनें फुलुनी न जों तनुलता 'शृंगारदेवी' नटे
भीतीनें दुसऱ्या क्षणीं दचकली, वाटे अवेळींच तें.

प्रेमानें झिडकारुनी मम करा, दूर प्रिया जाहली,
पाहोनी तिरकें, वदे मधुरवा, वीणा जणूं नादली,

" हें ऐसें भलत्याच वेळिं भलतें ' पाहील कोणी गडे '
साऱ्यांना हंसण्यास कारण, असें पाहून नाथा घडे "

बोलाया सजतां, वदे विनवुनी, ' पाहील कोणी गडे '
डोळ्यांनीं खुणवोनिया सुचविलें ' आतां तरी जा गडे '
हातांनीं सुचवी बघून भंवतीं ' पाहील जा जा कुणी '
अंगांनीं अवघ्या करी विनवणी ' पाहील जावें कुणी. '

* * *

## फुलपांखरूं

मधुर किती तव जीवन सखया
दुष्ट भावना नेई विलया
हर्षानें भरवाया हृदया
असाच राही — फुलवीत महि ही
सृष्टिसतीचा बाळ.

फुलांफुलांवरि सदाहि फिरसी
मधू तयांचा मधुर सेविसी
हर्षभरानें सदा नाचसी
स्वतां नाचसी — तूं नाचविसी
रसिकांच्या हृदयास.

क्षणांत संवगडि सवें घेउनी
पुष्पलतांच्या झेल्यावरुनी
जाउन बससी शीत-स्थानीं
नानापरिनीं — विहार करुनी
रमसी स्वर्गसुखांत.

रंग किती तव मोहक असती
विजेसारखी चाल तशी ती
त्रस्त मनाला क्षणीं मोहिती
माधुर्याची — आनंदाची
मूर्ति तुझी हे खास.

मधुर फुलांचें जीवन थोडें
बालपणाचे दिवसहि थोडे
गुणवंताचें जीवित थोडें
माधुर्याचा — शेवट साचा
झडकरि दुःखद होत.

तसाच होइल शेवट तव का ?
मनांत येतां मनास चरका
सहज बसे देहाला थरका
हृदय तळमळे — भरले डोळे
खिन्न मनीं मी होत.

स्वच्छंदानें विहरत असतां,
आनंदानें डोलत असतां,
हर्षभरानें नाचत असतां,
भान हरपसी — अवचित पडसी
कोळयाच्या जाळ्यांत.

स्वतंत्रता तव नष्ट जहाली
तनु परवशता-पाशीं पडली
सुम-शय्येची आशा मेली
फडफड करिसी — पंख उडविसी
मिळवाया स्वातंत्र्य.

यत्नांतीं तूं निराश होसी
परवशतेला तिरस्कारिसी
तुच्छ मानुनी प्राणा त्यजिसी
परि न साहसी — परवशतेसी
धन्य, धन्य, तूं धन्य !

क्षुद्र गड्या तूं अससी तरिही,
परवशता तुज असह्य होई,
तींतुनि निघसी त्यजुनि प्राणही
ज्ञानी मानव — बघुनि मृत्यु तव
हर्षित परवशतेंत.

* * *

## मनीषा

चित्ताला रिझवावयास असती वस्तू किती भोंवतीं.
वीणा घेउनिया करीं कुशल हा दावी कुणी कौशल,
गाई गायक, सूर ऐकुनि मनीं गंधर्व लज्जाकुल,
हांसे नाचत नर्तकी, अभिनया दावी कृती गोरटी,

लाभे सौरभ-वारि सिंचन सदा, शय्या सुमांची तरी
कांहींही न रुचे मनास, वसते आशा दुजी अंतरीं !

* * * *

गर्दी फार, तुफान घोर उसळे, गर्जे घनाली वरी,
भेरींचा अतितीव्र कर्णकटु जों ये नाद कानांवरी,
शत्रूंचें मज रक्तसिंचन घडे तेव्हां पिशाचापरी
नाचावें गमतें स्वतांच असिच्या म्यां तीव्र धारेवरी.

रक्तानें भरतां शरीर उघड्या भूमीवरी आदळे,
तोडी गृध्र हळूच तोंच लचका, वारी जया मी बळें,
तों येई रणदेवता, फिरवुनी प्रेमें शरीरीं कर
पाही प्रेमभरें, क्षतें विसरतों, हर्षे भरे अंतर.

* * *

# ललाट लेख

माझ्या तीव्ररवें प्रशांत धरणी मी कांपवीन क्षणीं
तो भेदील नभास, ऐकुनि खला वाटेल माझें भय,
ती माझी भयगर्जना श्रवुनिया व्याघ्रादि रक्तप्रिय—
भीतीनें मरतील आणि समता, नांदेल साऱ्या वनीं.

कोल्हे क्षुद्र तसेच चोर दुसरे बोकाळले श्वापद
स्वैराचार कसा सुचेल जंव मी बांधीन त्यांचे पद.
दृष्टिक्षेप बघून आग हृदया लागेल दुष्टांचिया
मी सम्राट जगांत एक सगळे येतील वंदावया.

भाळीं लेख परी विधी लिहितसे कांहींतरी अन्यथा
आशा सर्व मनोरमा हृदयिंच्या, हा हाय ! जाती वृथा.
ये कोणी खल केसरीस फसवी, जाळ्यांत त्यातें धरी
डोकें आपटितो सदा तडफडे, दुःखें रडे केसरी.

आशेचीं थडगीं अनंत बघतो तो दृष्टिनें प्रत्यहीं
आतां अश्रु-जलें सदा भिजुनिया हो आर्द्र खालीं मही.

* * *

# बघशिल काय वळून !

बघशिल काय वळून — दयाळा
पूजाया तुज चुकलों म्हणुनी
जाशी काय रुसून ?

सतत छेडिलें तुला म्हणुनि का !
जाशी तूं चुकवून ?

दुरून केलें नमन म्हणुनि का
जाशी तूंहि दुरून ?

पाठ फिरविली जवळी येतां
जाशि पाठ फिरवून ?

गाढ झोंपलों आगमनीं तव
निजसी आज म्हणून ?

विसर अम्हां हो तव नामाचा
जाशि तूंहि विसरून ?

विसरे बालक माय, तरी कां
जननी जाय त्यजून ?

* * *

उपेक्षितां तूं मानेवरती
जूं बसलें जखडून !

दूर लोटितां तूं जग सारें
बोलें धिक्कारून !

पाठ फिरवितां तुवां, आमुची
पाठ निघे सोलून !

रुष्ट जाहला तूं म्हणुनि बसे
चाबुक बघ सडकून !

अनाथ बघुनी, मत्त काढिती
जात्यामधिं भरडून !

तुझ्या कृपासावलीस मुकतां
जीव निघे पोळून !

पीळ मनीं तूं धरितां, काढी
मदांध काय पिळून !

पाय वळवितां तूं, शिरिं लत्ता
—जाई शीर तुटून !

तूंच पारखा, मारूं हाका
कोणाला विवळून ?

करुणा अजुनि न येई का तुज ?
जाइल जीव निघून !

* * *

## उन्मत्त भूपतीस

काळ तुझा फिरला — राजा,
विचार करुनी टाक पाउला.

उच्च आसनीं मिरविसि डौलें
आसन परि तव डगमग हालें,
झोक जाउनी पडशिल खालें,
नेम नसे कसला ! —राजा,

विहार करिसी भव्य महालीं,
उपहासुनि बघसी भंवतालीं,
दृष्टि जरा रे वळवी खालीं
पाया बघ खचला—राजा,

ऐरावत तव झुलतो दारीं,
रत्नखचित त्यावर अंबारी,
तव दुष्कृतिचा चिखल बघ परी,
त्यांत करी फसला—राजा,

अधिकाराची झडते नौबत,
चढतें वैभव सांगे गर्जत,
सेवक चढते टोले हाणित
फोडिल रे तिजला—राजा,

नृपा, कवायति ह्या तव फौजा,
व्यर्थ करिसि कां गाजावाजा ?
एक न त्यांतिल येइल काजा
मिळशिल जंव धुळिला—राजा,

मित्र म्हणुनि तूं पोळ चारिले,
स्वैरपणें ते करिती चाळे,
प्रसंग येतां करितिल काळें
सोडुनिया तुजला—राजा,
काळ तुझा फिरला
विचार करुनी टाक पाउला.

* * *

## इशारा

भाग्य—शिखरीं तुझें स्थान अचल न गणी,
करुं नको कृति नृपा, नीतिपथ सोडुनी.

भाग्य-गिरिच्या क्षणीं चढुनि माथ्यावरी
तीव्र तापें रवी, त्रस्त विश्वा करी,
थोर त्या वैभवीं पतन त्याचें परी,
जातसे भूतलीं हीनबल होउनी.

मत्त घनराज बघ रूप विक्राळ धरि,
घोर भैरव-रवें घालुनी भीति उरिं
येतसे भूवरी प्रलय करि क्षणभरि
नष्ट-जीवन दुजा जात विलया क्षणीं.

वर्षर्तु येतसे, जलमया मेदिनी,
खळखळे घोष करि धुंद मंदाकिनी,
येइ जें जें पथीं, ने बळें ओढुनी,
काळ जातां जरा शुष्क कल्लोलिनी.

मत्त सौदामिनी, वक्रगति कडकडे,
घास घ्याया नभाचा बघे ओरडे,
आग लावी तया, येइ जें जें पुढें,
मृत्यु त्यांच्या अर्धी ने तिला ओढुनी.

अमित सत्ता तुला दैवयोगें मिळे,
बुद्धिधन लाभलें, धुंद दृष्टी चळे,
सज्जनांची खला खणुनि पाळेंमुळें,
देशभक्ता सुळीं चढविसी हांसुनी.

धुंद होऊनि तूं घोर करिसी कृती,
दीन–जन चिरडिसी, छळिसि अबला सती,
अंतकाळीं तुझी भ्रष्ट झाली मती,
काळ आला पहा, उमज अजुनी मनीं.
भाग्य–शिखरीं तुझें स्थान अचल न गणी.

* * *

## मदांधास

मत्त सत्ता-बळें—दृष्टि भरली मळें
मूढ, तुज ना कळे — ईश-लीला.

मत्त लंकापती वैभवानें चळे,
देव बांधोनिया बंदिं घाली बळें
'देवदेवेश मी बलहि मम आगळें,'
कीड खाई परी — वैभवाला.

रुद्र विश्वांतकहि दूर तैं राहिला,
काळ नच येतसे न्यावयाला खला,
क्षुद्र कपिनीं तया उलथुनी पाडिला,
मत्त बलि पोंचला—दुर्गतीला.

कंस खळ दुर्मती राज्यलोभें चळे,
जन्मदात्यासही बांधुनी कोंडिलें,
तुच्छ ईशा गणी, सज्जनांला छळे,
ना कळे परि खळा—दैवलीला.

आठ वर्षें पुरीं जाहलीं नच वया
दूध ओठामधें, कोंवळा बाळ त्या
ओढितो भूतळीं, लाथ मारोनिया
चिरडितो सहज बघ — त्या खळाला.

सर्वशक्ती नको तुजसि चिरडावया,
रुद्र-देवहि नको कंठ छेदावया,
विश्वराजहि नको धूळ चारावया,
काळ न्याया हवा – रे कशाला ?

तुच्छ जन मानिसी, चरणिं त्या तुडविसी,
दीन दुबळ्या जनां नित्य तूं रडविसी,
एक त्यांतिल परी काळ होइल तुसी,
ठार मारिल तुला — रे क्षणाला.
मत्त सत्ता-बळें—दृष्टि भरलीं मतें
मूढ, तुज ना कळे—ईशलीला.

* * *

## समर्पण

अर्पिला बाळ तव पद-कमला,
स्वातंत्र्य-देवि, बलिदान तुला.

वळवाया तव प्रसन्न दृष्टी
किति वीरांनीं दिल्या आहुती,
किति युवकांनीं गळ्याभोंवतीं
गळफांस हांसुनी अडकविला.

स्वकरें देवी, तव पदकमलीं
बाळें अर्पुनि कोमल अपुलीं,
वीरसतींनीं कुळी उजळली,
तव विमल यशोध्वज फडकविला.

रोगें पीडित पामर मरती,
क्षुद्र जंतुपरि मरतां रडती,
कूस जननिची व्यर्थ शिणविती,
जाहले अजागळ भार तुला.

देवी, एकच सुत हा मातें,
दीन गांजल्या मातृ—भूमितें
तव मंदिर—पथ दावायातें
कां देउं नये कुलदीप तुला ?

तोडुनि सारें माया-बंधन
अर्पी माते, तुज कुल-नंदन,
करुनि प्रसंगीं तो रण-कंदन
जननीस्तव वेंचिल निज-तनुला.
स्वातंत्र्य-देवि बलिदान तुला.
अर्पिला बाळ तव पदकमला

* * *

## दिवाळी

नवकोट दिवे हे तुझ्या घरीं,
तव दृष्टिपुढें तम दाट परी !
घरोघरीं हे दीप लागले,
स्थिरचर तेजोरसांत न्हालें.
जगांतून तम दूर पळालें,
परि भरलें तम तव हृदंतरीं.
दीपमालिका चहुंबाजूला
पान-फुलांच्या त्यावर माळा
अभिनव शोभा दिसे दृष्टिला,
गे, वदनकळा तव विटे परी.
धूर चहुंकडे संपत्तीचा
बडेजाव हा ऐश्वर्याचा,
थाटमाट दिपवी लक्ष्मीचा,
कंगाल दीन तूं रडसि परी.
दीपमाळ अणुअंणूस उजळी,
गुलामगिरिची परी काजळी
मुखास जननी तुझ्या लागली,
ती कवण दीप गे, दूर करी ?
अवसेच्या घन तिमिरामधुनी
स्पष्ट सर्व पथ दिसती भुवनीं,
तमोव्याप्त परि पथ तव जननी,
तम वाटेवरचें कोण हरी ?
नवकोट दिवे जरि तुझ्या घरीं.
तव दृष्टिपुढें तम दाट परी.

* * *

## पंख छेदलेल्या पांखरास

विशाल या गगनीं—पांखरा,
तूं स्वैर-विहारी नाचलास रे या साऱ्या भुवनीं,
मधुर निनादानें — आपुल्या
गाउनी मजेनें, विहंगमा, तूं घुमविलींत रानें,
परि दुर्दैवानें भलतें रे जाहलें,
जाळ्यांत पकडुनी फसवुनि तुज आणिलें,
मेलेल्या अन्नावरी तुला जगविलें,
टिचभर जागा ही — पांखरा,
त्या दुष्ट धन्याच्या दारापुढची विश्व तुझें होई.

पकडुनि कपटानें — पांखरा,
तुज लोळागोळा करुनि खिळविलें भूमीवर ज्यानें,
दारीं बसवोनी — तुला रे
नव-शोभा अपुल्या विहंगमा, जो सदनाला आणी.
ज्या मत्त धन्यानें पंख तुझे छेदिले !
( अडतात चालतां आज तुझीं पाउलें ! )
उपकार ! तुझ्यावर ज्याचे हे जाहले !
गोड शब्द वदुनी — पांखरा
कां त्याच धन्याला रिझवायाला झटसी दिनरजनी ?

प्राणाहुनि प्यारें — तुला जें
स्वातंत्र्य जयानें कायमचें तें हरिलें विहगा रे.

पंगू बनवीलें — पांखरा,
तुज गुलामगिरिच्या गर्तेमध्यें ज्यानें लोटियलें.

कां समोर त्याच्या तालावर नाचसी?
कां तदागमीं तूं उन्नत शिर झुकविसी?
तत्स्वागतार्थ कां मधुर बोल बोलसी?

लाज न कां तुजला? — पांखरा,
कां लालचावला जीव? कुठें अभिमान तुझा मेला?

* * *

## मृत्यूस

मृत्यो, चालूं दे तव नाच,
    बलवंताचा हात धरुनिया — चालूं दे

स्वागत मृत्यो, तुझें कराया,
दृढ आलिंगन तुजला द्याया,
प्राणफुलें प्रिय तुज अर्पाया,
    उत्कंठित जन साच — मृत्यो, चालूं दे

मातृभूमितें मुक्त कराया,
    उत्सुक सारे तनु अर्पाया,
क्षुद्र आमुचा काय पुराया—
    स्वकरें खणु रे खांच — मृत्यो, चालूं दे

विवाह-गृह तव सदना मानुन
वधूवरासम युव-युवती-गण
येतिल बघ तव घ्याया दर्शन,
    कोण गणी तव काच ? — मृत्यो,
        चालूं दे तव नाच.

* * *

# वियोगिनी

फुल्लें सुम दाटला मधू
भ्रमराचा परि ठाव ना कळे,
असशील कुठें रसज्ञ तूं,
नवती ही शरिरांतुनी गळे.

रवि-तीव्र-करीं जळोनिया
सुम निर्गंध पडेल भूवरी,
किति दुःख सुमास होइल—
—स्थलिं त्यानंतर भृंग ये जरी.

नवती विरहानलीं जधीं
जळुनी हो तनु शुष्क कोमल,
मग आगमनें तुझ्या मला
मरणप्रायहि दुःख होइल.

मधुमास सुरम्य पातला
जंव घे पंचमिं तान कोकिला,
नच ये चुकला रसज्ञ तें
परिसाया मधुगान त्या स्थला.

सरला ऋतुराज त्या क्षणीं
मुकली गोड गळ्यास कोकिला,
स्वर पंचम केवि घे गळा
जरि गान-प्रिय तेथ पातला.

फुलली फुलबाग तोंच ये
खुडुनी घे सुमनें हवीं तशीं,
बहर क्षणिं ओसरेल तो
मग देतील लता सुमें कशीं ?

सरिता जलपूर्ण तद्‌हृदीं
उठती रम्य तरंग तोंवरी
अमृतासम अर्पुनी जला
सुखवी ती तृषितास अंतरीं;

जल अर्पिल ती कशी परी
जलशून्या जंव होय निर्झरी ?
उठतील तरंग पात्रिं कां ?
नच तृष्णाकुल शांत ती करी.

हृदयीं जल दाटुनी गळे
घनमाला गगनीं अशी फिरे,
घन-बिंदु-तृषार्त-चातकें
उघडावें मुख तोंच हें बरें !

उघडून मुखा नभा बघे
शरदीं चातक एकसारखा,
तरि त्या जलबिंदु शुष्क ती
जल द्याया घनपंक्ति शक्त कां ?

*      *      *      *

नलिनी शशि-दर्शनोत्सुका
तिजला स्पर्शुनिया करें मृदु,
हंसवी शशिराज येउनी
किति ही लाजुनिया खुले वधू.

लतिका नव-पल्लवीं नटे
कर-शाखेवर सांवरोनिया,
तरुराज हृदीं तिला धरी
नच सोडी क्षण तीहि तत्प्रिया.

करि नृत्य मयूर सुंदर
खिळली दृष्टि सखी-मुखावरी
विसरून जगा प्रियासवें
सखि त्याची मधुनाच ही करी.

कलहंस विहार हा करी
निकटीं घेउनिया निजप्रिया,
प्रिय-सांनिध हंसिका रमे
उपहासे बघते जगास या.

पिक गोड लकेर घेतसे
बसुनी आम्रतरूवरी सया,
करि गान तसेंच कोकिला
मिळवी सूर सुरांत त्याचिया.

बघते दृष्टि विशून्य जों नभा
हंसते वीज घनासवें, दिसे,
चपला घन सांवरी सदा
विरहाची तिज कल्पना नसे.

बघतें अशिं युग्मकें सदा
विरहाग्नी भडके तसा मनीं,
प्रिय-संगम हा बघोनिया
जळतें मी विरही वियोगिनी.

* * *

## दयाघना

कां माया पातळ केली देवा, अशी ?
जळते अनुदिन—दयाघना, मन
करुणा ये ना कशी ?

मन रमलें भुलुनी नटव्या दृश्यावरी,
पद घसरुन केली काळी करणी हरी,
अजि नेत्र उघडिले, पापें खुपती उरीं,
करि शांत तापल्या जीवा घेउनि कुशी—कां माया

किति मायाजाळीं फसले ज्ञानी यती,
मी सान अजाणाहि, नवल न चळली मती !
क्षण पश्चात्तापें अघनिधि परि नाशती !
मग पापें माझीं शेष राहिलीं कशीं ?—कां माया

अति दुर्जन, खटनट, नीच, महापातकी
तव पायधुळीनें तरले प्रभुजी किती !
कां उपेक्षिसी मग हाच दीन पातकी ?
ये पदरज उधळी, तार, अहल्या जशी ?—कां माया

करि माय सारखी माया पुत्रावरी !
परि एक तयांतिल चुकला फसला जरी
ती धांवत जाई लोटुनि इतरां दुरी !
मी चुकतां नच कां जगज्जननि धावसी ?
कां माया पातळ केली देवा, अशी ?

* * *

## सांग मला बाई

‘ कसें शोधिलें प्राणसख्याला ?
मार्ग तुला गे कुणीं दाविला ?
पुनः पुन्हां तूं म्हणसी मजला
सांग गडे बाई ’.
‘ झेलुनि लाविल जो हृदयाला
शोधायाला रसिक–वराला
जाइ कशी गे कविता बाला
सांग मला बाई ’.
‘ सर सर सरिता धांवत जाई,
एकरूप जलधीशीं होई,
प्रियकर–पथ तिज कोण दाखवी
सांग मला बाई ’.
‘ कळ्यांत लपुनी वसंत आला,
मधुर गातसे गीत कोकिळा,
तदागमन तिज कळावयाला
कोण गडे येई ? ’
‘ भास्कर राणा येइल आतां
कशी कुठुनि ये उषा स्वागता ?
कोण तिज कथी प्रियकर–वार्ता
सांग मला बाई ’.
‘ हीं हृदयाचीं अगम्य कोडीं,
गूढतेमधीं त्यांच्या गोडी,
उकलाया तीं जनता वेडी
यत्न करी बाई. ’

* * *

# अंधारांतील घाव

स्वार्थांध जगीं या प्रेम शुद्ध नाढळे !
मज भाग्यवान मी मानीं, सन्मित्र सद्गुणी मिळे.

मोकळ्या मनानें गुजगोष्टी सांगुनी,
हांसलों, खेळलों, सारें संसारदुःख विसरुनी.

बोलुनी गोड विश्वास पुरा दाविला,
अडकला गळाला मासा, मग हळूं डाव टाकला.

झोंपलों शांत, अंधार दाट माजला,
चोरट्यापरी तो कोणी येउनी घाव घातला.

तो वार विषारी, जिव्हारीं लागला,
हृद्बंध तुटे क्षणिं गोळा डोळ्यांत जीव जाहला.

उघडिले नेत्र तों, हाय ! काय मज दिसे ?
जो सखा जिवाचा त्यानें हें प्रेम दाविलें असें !

आकाश कोसळुनि आदळतें जरि शिरीं
लवता न जरा मम माथा, वाढतें धैर्य अंतरीं.

संगरीं रिपूंचे वार चहूबाजुंनीं
घेउनी शिरावर मोदें नाचतों विकट हांसुनी.

थैमान घालता मृत्यु पुढें माझिया,
देउनी करीं कर त्याच्या घालतों साद मी तया.

खर-नखरिं फोडुनी कंठ रक्त प्यावया
जर हरी धावता, पायीं तुडवितों बलें मी तया.

जरि कृतांत येता आयुध सरसावुनी,
खेळतों झुंज मी त्याशीं हटवितों बलें त्या क्षणीं.

वरुनिया असा परि स्नेहभाव दावुनी,
घातला घाव हा मर्मि रात्रीस संधि साधुनी.

फाटलें हृदय मम, कशा साहुं ह्या कळा!
दे धीर कोण अवकाळीं, तुजविना प्रभो, व्याकुळा.

* * *

## हृदयवीणा

जीवितेश्वर ! वद काय तुला द्यावें ?
दीन-दुर्भग मी असे तुला ठावें,
हृदयवीणा परि जवळ चिमुकली ही,
तीच चरणीं तव प्रेमभरें वाही.

जरी छेडाया लागशील तारा
देश भंवतींचा निनादेल सारा,
तुझ्या हृदयांतिल सूर उमटतील,
प्राणनाथा, नित तुला सुखावितील.

हर्ष-लहरी तव हृदय-सागरांत
जधीं नाचाया लागतील नाथ !
तदा द्विगुणित आमोद करायाला
हृदयवीणा लागेल गावयाला.

धैर्य सोडुनि तुज संकटांत जातां
निरुत्साही होशील जधीं नाथा !
काढुनीया मधु-मंजुल-स्वनातें
हृदयवीणा देईल धीर तूंतें.

सतत झटतां कर्तव्य-पालनांत
श्रमें होइल तव देह बहु क्लान्त,

हरायाला तव नाथ, तदा शीण
हृदयवीणा गाईल गोड गान.

सदा छेडिल तुज हवे तेच सूर,
कधीं जाइल नच सोडुनिया दूर,
हर्ष होतां तुज वाढवील त्यातें,
आणिं गाइल तव दुःख हरायातें.

* * *

# तेव्हां आणि आतां

चित्त आशायुक्त जेव्हां विश्व सारें रम्य वाटे,
वस्तुमात्रीं व्यक्त होई यौवनाची तैं नव्हाळी.
अंतरीं आशावली ती लोपली नक्षत्रमाला,
कृष्ण—मेघांची किती आतां हृदीं दाटी जहाली.

सद्विचारांची मनीं मी गुंफिली जी पुष्पमाला,
शुष्क पुष्पें आज सारीं, माळ ती निर्गंध झाली.
यौवनाची बेफिकीरी आणि धुंदी नष्ट झाली,
चारुता विश्वांतली सारी क्षणीं एका पळाली.

भावनेच्या कोंवळ्या गेल्या कळ्या साऱ्या सुकोनी,
कल्पनेचीं रम्य चित्रें आज सारीं तीं जळालीं.
यौवनाच्या तैं वसंतीं कोंवळ्या भावांकुराला
प्रीतिची त्या रम्यकाळीं पालवी जी दिव्य आली—

कोंवळी ती ग्रीष्म-तापें पालवी सारी जळाली,
आणि आतां अंतरींच्या अंकुराची राख झाली.
प्रीतिगंगेंतील पाणी सर्वही आटून गेलें,
आज पाण्यावांचुनी ग्रीष्मीं जिवाची हो कहाली;

शब्दपुष्पांची न शीर्षीं हो कधींही रम्य-वृष्टी,
रोज ही आतां कडाडे वीज गेहीं — जीव जाळी.
चित्त आशायुक्त तेव्हां विश्व सारें रम्य वाटे,
चारुता विश्वांतली सारी परी आतां निमाली.

* * *

## प्राणसंकटांत

जळिं तुफान खवळे जरी—
सखे, कां शिरे भीति अंतरीं ?

भोंवतीं उसळतां जळ,
जरि कृष्ण — दिसे उज्वळ,
तव सतेज तनु श्यामळ
प्रकटली त्यांत गोजिरी — सखे, कां

भोंवरा गरगरा फिरे,
पाण्यावर नजर न ठरे,
वरि नाव तशी थरथरे
चुंबनीं प्रथम तूं परी — सखे कां

जरि गहिरें जळ अस्थिर
तव चंचळ नजर स्थिर,
कां लाल गाल पांढुर ?
कां झालिस गे घाबरी ? — सखे, कां

ये हांस पहा मजकडे,
मिठि घाल गळ्याला गडे,
चिर–मीलन अपुलें घडे,
जर गळे विरह-पट तरी — सखे, कां

सहवास लाभल्यावरी
स्वर्लोकीं वा भूवरी
पाताळीं कोठें तरी
संसार थाटुं संदरी — सखे, कां
भीति शिरे अंतरीं ?

* * *

## वंचिता

त्वां मोहिलें मधुबोल बोलुनि हांसुनी गालीं मना,
केल्या तुवां हृदयांत जागृत सुप्त कोमल भावना,

धिःकारुनी कटु-भाषणीं त्वां प्रेमभाचा जाळिलें,
स्वर्नंदनांतुनि चंचले, मरुभूवरीं मज लोटिलें,

रिझवावया हृदया सये, देओनिया वीणा करीं
कितिदां तरी मज गावया त्वां प्रार्थिलें प्राणेश्वरी;

फटका तिला मारावया धजला कसा कर सुंदरी ?
तारा क्षणीं तुटतां खुपे बेसूर गे, मृदुअंतरीं.

कंठामधीं प्रेमें तुझ्या नव पुष्पमाला घातली,
नव भावना हृदयीं उठे रोमांचली तनु कोंवळी,

सुकली न जों अजुनी पुरी, फेंकोनिया तुडवावया
शंका जरा नच वाटली कां निर्दये, हृदया तुझ्या ?

लागे सदा जी दृष्टि आगमनाकडे मम सुंदरी,
केला सुधावर्षाव ज्या नयनांतुनी हृदयावरी;

चुकुनी कधीं पथिं भेटतां बघसी अतां उपहासुनी,
पाही विषारी दृष्टिला, हृद्‌बंध गे, तुटती क्षणीं.

देतां करीं तुज मुद्रिका वदलीस तूं रागावुनी
“ देतात कां करिं ” अंगुली केली पुढें त्वां हांसुनी,

बोटांत ती तव घालतां प्रीति फुले गालावरी,
अवमानुनी त्वां निर्दये, ती धाडली परती परी.

गोळी विषाची, शर्करा वरुनी तिला लावोनिया,
वदनीं तुवां मम घातली, गालीं जरा हांसोनिया,

हालाहलें व्याकूळलों तुटतात जों मम आंतडीं,
हांसून लीला पाहसी, प्राण त्यजी जंव गे कुडी.

* * *

# विसरुनी जातें

पहावें सारखें त्याला — सदा जरि वाटतें चित्तीं,
बघें, तों उर थरथरतो — बावरी होतसे दृष्टी.

दाखवूं प्रेमभावाला — वाटतें हृदय उकलोनी,
परी येतांच तो जवळीं — मूक ही होतसे वाणी.

बसें तच्चित्र रेखाया — घेउनी कुंचलां हातीं,
तोंच फलकावरी राही — उभी डोळ्यापुढें मूर्ती

पुन्हां भेटावया येतां — ठरवितें, त्यास कवळावें,
परी येतांच तो सदनीं — असें कां मूढ मन व्हावें ?

कितीदां हृदय उकलोनी — लिहावें, पत्र करिं घेई,
परी 'श्री' वांचुनी दुसरा — लिहाया शब्द नच येई.

मनींचे हेतु पुरवावे — रोज मी बेत ठरवीतें,
परी पाहोनिया त्याला सर्वही विसरुनी जातें.

* * *

## न कळे कांहीं

धुंडिसि कोणा — विनवितों, सांग मज पवना ॥ ध्रु० ॥

विहार करिसि क्षण उद्यानीं,
दुज्या क्षणाला निर्जन रानीं,
सवेंच जाशी भलत्या स्थानीं,
पळशि भरारा — कां न मिळे तुजला थारा ?

फिरसी किल्लेकोटांमधुनी,
भयाण कुहरांमध्यें शिरुनी,
पळसी कां गिरिशिखरावरुनी ?
धुंडिसि कोणा — विनवितों, सांग मज पवना

सुखविसि केव्हां तूं मनुजांला,
केव्हां दावुनि अतर्क्य-लीला
जगा इच्छिती ग्रासायाला
चंचल लहरी — तव, अससि असा कां लहरी ?

केव्हां मधुगंधानें नटणें,
केव्हां दुर्गंधातें वरणें,
केव्हां रूपावांचुनि फिरणें,
नाना ऐशीं — रूपें कां पवना घेशी ?

कोठेंही नच गुंगुनि रमसी,
विसांवा न तूं क्षणभर घेसी,
रात्रंदिन कां धांवत सुटसी;
वरुनी झाली — किति युगें मुशाफरि असली ?"

"जयें निर्मिलें तया शोधितों,
मुशाफरी ही म्हणुनी करितों,
अनादिकालापासुन फिरतों,
न कळे कांहीं ! — विश्वराज कोठें राही ?"

* * *

## फेड

केवड्याची माजली दाट राई,
सुगंधानें परिपूर्ण दिशा दाही,
भुजग येई ज्या गुंगवी सुवास,
लुब्ध तेथें तो करितसे निवास.

गार छायेमधिं कृष्णसर्प लोळे,
पिउनि गंधानिल धुंद, सदा डोले.
भुजग-भीतीनें दूर लोक जातां,
सुवासाचा नच कुणी उरे भोक्ता.

सहज वायूची एक लहरि आली,
पुष्प कोमल नाचलें तया वेळीं,
फणींद्राच्या आघात फणीं झाला,
क्षणीं उसळे, डिवचिलें गमे त्याला.

मृदुल पुष्पामधिं तीक्ष्ण शिरे दांत,
दंश केला ओतिलें कालकूट!
जळे सुम, मधुगंध नुरे कोठें,
काय उपकृतिचें होय त्या खलांतें!

कसा जातीचा विसरुनी स्वभाव,
मनीं जाणिल तो खल प्रेमभाव?
जरी पाजियलें दूध कुणी त्याला
तरी ओकिल तो त्यावरी विषाला!

* * *

# जगाचा शिक्षक

“ मात्तल झालों ग, अतां मी बघ बाबासलखा,
थितावीन आई ग तुद् गदे, मी सगलं बलं कां ?
घे हातीं पाती उदलनी काध पेन्सिलीनें,
नाहींतल छदि ही, बघ ” वदे बालक ऐटीनें.

शिक्षक बसला हा चिमुकला छडी करीं धरुनी,
हंसलों क्षण, दुसऱ्या क्षणीं ये चुकी मला कळुनी.
विचार नच करितां बालका, हंसलों मी तुजसी,
शिक्षक जगताचा व्हावया योग्य तूंच अससी.

पापविचाराचा स्पर्शही नच ज्याच्या हृदया,
योग्य तूंच अससी गुरू ह्या जगास शिकवाया.
श्रेष्ठ-नीच लटका ठाउका नच भेदाभेद,
सरळ बालका कां तुझ्याहुनिं पवित्रतर वेद ?

रंग आंत काळा, वरुनिया दावावा धवल,
बगळ्याची वृत्ती ठाउकी मना न तव सरल.
दावुनिया प्रीती, हळुंच मग ओकावें गरल,
लटक्या प्रेमाची कल्पना नच हृदया विमल.

नीतीचा पुतळा, पुण्य तव रूपें अवतरलें,
सुगुण एकवटुनी चिमकुल्या देहामधिं नटले.
मनामधीं भलतें, बोलतों भलतें, कृति भलती,
नालायक आम्ही खरोखर गुरु व्हाया जगतीं ?

वाणी–मन असतां अमंगळ शब्दांत न ‘ राम ’
कंठशोष केला, कसा परि व्हावा परिणाम ?
पैशानें चाले आमुची ही पोपटपंची,
सत्त्वहीन असल्या न किंमत विकल्या वाणीची.

शब्द-वर्ण आम्ही शिकवितों नच अर्थज्ञान,
ब्रह्मज्ञान दुजा, कोरडे ठरतों पाषाण.
शिक्षक जगताचा व्हावया योग्य तूंच अससी,
चिमण्या गुरुराया, अज्ञ मी नमन करीं तुजसी.

ज्ञानवंत गुरु तूं भेटसी आज खरा मातें,
शिकेन तुजजवळी ‘ तरुशिरीं मूळ दिसो उलटें. ’

* * *

# सौंदर्य व रसिकता

गुलाबाचें मधु हास्य करी फूल,
पूर्ण विकसें—मम मना पडे भूल.
खुडायाला धांवलों पुढें, तोंच—
पुष्प वदलें मज थांबवून नाच.

"काय सौंदर्य-प्रीति तुला वाटे—
म्हणुनि उत्सुक तूं खुडायास मातें ?
रसिक मोठा तूं मानिसी स्वतःला,
कसा सजसी सौंदर्य विनाशाला ?

रसिक कसला ? सौंदर्य पाहुनीया—
सजे चळुनी जो भ्रष्ट त्या कराया,
भ्रष्ट हृदयामधिं पाप उदित होई,
सिक असाशील तरि दुरुनि मला गाई."

* * *

सेवा-वृत्तीनें मरे मन, बनलें पाषाण,
कोमल भावांचा कसें तें करील सन्मान ?

गुलाम जंव बनलों जळाले भाव मधुर बाळा,
अधिकारी म्हणती, 'कोठचें हृदय गुलामाला'!
काय दोष त्यांचा ! हृदय जर असतें आम्हांला
तडफडुनी मरतें, साहतें नच ह्या दुःस्थितिला.

* * *

## दग्ध हृदय

वेळ फार थोडा, निघालों कामावर जाया
दुडुदुडु धांवत ये बाळ, मम मिठी पडे पाया.
“ कुथें दाल आतां, थोडुनी मदला बाहेल,
आद अम्ही नाहीं तुम्हाला दाऊं देनाल. ”

उचलुनि मी घेई, चुंबिलें फिरफिरुनी बाळा,
विजय-हास्य तेव्हां, तयाच्या खुलवी वदनाला.
अर्ध-स्मित वदनीं, लालिमा वर उठल्या गालीं,
कावेबाजपणा मुखावर दिसे त्याच काळीं.

बाल-वदन बघतां विसरलों मी क्षणभर भान,
मोदाच्या लहरी घालिती हृदयीं थैमान.
बाह्य जगा नच जों विसरला आनंदी जीव,
सेवक-वृत्तीची तोंच हो क्षणांत जाणीव.

मूर्ति वरिष्ठाची ठाकली झणिं नयनापुढतीं,
आणि दृष्टि दिसली — थरकलों, मनिं उपजे भीती.
उतरुनिया खालीं ठेविलें मूर्तानंदाला,
पाउल वळवोनी हमाली निघे करायाला.

ध्वनि कानावरती जरी ये बाल-रोदनाचा,
निष्ठुर नच वळलों, बघें मी रस्ता मजपुढचा.

सेवा-वृत्तीनें मरे मन, बनलें पाषाण,
कोमल भावांचा कसें तें करील सन्मान ?

गुलाम जंव बनलों जळाले भाव मधुर बाळा,
अधिकारी म्हणती, 'कोठचें हृदय गुलामाला' !
काय दोष त्यांचा ! हृदय जर असतें आम्हांला
तडफडुनी मरतें, साहतें नच ह्या दुःस्थितिला.

# लोटेल परी काळ असाही

स्वैर करितसे विहार खगवर,
उत्साहाची मूर्ति खरोखर,
क्षणिं उल्लंघी गिरिवर–सागर
दूर दिगंतर — तोडी अंतर
क्षणांत एका खगराया.

पवन-लहरिवर नाचत यावें,
स्वैर नाचुनी गात फिरावें,
गोड-गायनीं जग भुलवावें,
स्वच्छंदानें — गाणें, फिरणें,
हेंच जिवाला त्या ठावें.

अवगणुनी या क्षुद्र जगाला,
बघे सदा नभिं विहरायाला,
उल्लंघाया झटे नभाला,
वरि वरि जाई — बंध न कांहीं,
मूर्त अवतरे स्वातंत्र्य.

झोंपायाला दिनकर गेले,
काळोखानें विश्व व्यापिलें,
सैतानाचें राज्य पसरलें,
काळ बदलला — डाव उलटला
रडणें आलें नाशिबाला.

परिस्थितीनें झालें भलतें,
दीडवितीचें नच जें घरटें,
नभोविहारी होतां उलटें
पंख आवरुनि — पाय बांधुनी
स्वस्थपणें हा त्यांत पडे..

लोटेल परी काळ असाही,
उजळील उषा दिशांस दाही,
अभिनव-तेजें विहंगराजही
स्वैरभरारी — पवनविहारी
अंतराळ हें लंघील

* * *

## दृष्टिकोन

रानीं रम्य विशाल एक पसरे कासार कोठेंतरी,
त्यामाजीं स्फटिकापरी जल वसे सुस्वच्छ कांचेपरी,

तीरीं वृक्षलता सुमें विखरती सद्गंध वाऱ्यावरी,
होतें नाचत पद्मखंड पवनें उत्फुल्ल नाना सरीं.

* * *

येई एक युवा तटीं क्षणभरी राहे उभा निश्चल,
नाचे वायुसवें तडाग—जल तें, लाटा जलीं चंचल,
वाटे रम्य तडाग, तीर, कमळें सारेंच चेतोहर,
आशापूर्ण मनास विश्व सगळें भासे नवें सुंदर.

पाही सुंदर मौक्तिकें चमकती तो पद्म-पत्रावरी,
'माला गुंफिन मी प्रियेस्तव' निघे वेंचावया सत्वरीं,
वेंचाया मणि धांवतां अडकलें पंकीं रुते पाउल,
पंकानें मलिनांग हो, श्रमुनि ये, कष्टें तटीं दुर्बल.

* * * *

ये पापी, निज-दुष्कृती स्मरुनिया दुःखें मनीं जो जळे,
रत्नांची द्युति पाहुनी क्षणभरी तच्चित्तही लोभलें,
जों लावी कर हाय ! तोंच बनलें पाणी, जळाला मनीं,
"पापी-स्पर्श घडे मदीय ! कुदशा ये मौक्तिकांना क्षणीं."

* * *

रत्नें पाहुनि हा कुणी हुरळला, गेला धराया जवें,
हाले, वीचि जलीं अनंत उठतां तें पत्र लाटासवें,
मोत्यें ओघळुनी क्षणीं हरपलीं, गेलीं सराच्या तळीं,
दुःखानें बडवून ऊर रडतो, लाभे न रत्नावली.

* * *

विश्रांति-स्थल एक बालक, परी ने काळ ओढून तें,
येई विव्हल शोकदग्ध जननी, गाळीत अश्रू तिथें,
बोले ती "कमलोद्भवा प्रभुवरें ओढून नेतां जवें,
शोकें व्याकुल होउनी कमलिनी ह्या गाळिती आसवें."

* * *

आला एक खुळा कवी कुठुनसा तें दृश्य पाहोनिया,
हो तल्लीन, हळूंच गीत वदनीं ये, लागला गावया,
"नौकापत्र न तें, विहार करिती स्वर्गांगना येउनी,
पुण्यात्मे अवनीवरी विहरती कीं सूक्ष्मरूपें कुणी.

दावाया निजवैभवा, पसरलीं रत्नें तडागांतरीं,
आणोनी जलदेवता विरचती तीं पद्मपत्रावरी,
नीलाकाशच, पद्म-पत्र नच तें दिव्या मनोहारिका,
तेजें त्यावरतीं अशा चमकती कीं हासऱ्या तारका.

कल्पांतीं विलयास जाइल जगत्, निर्मावया विश्व तें,
धाता ठेवितसे जपून गमतें, बीजें अशीं हीं इथें,
किंवा पुष्पक-वाहनांत बसुनी जातां कुबेर-प्रिया,
कंठांतील तुटून माळ पडलीं रत्नें, इथें पत्रिं या."

* * *

वेडा ये, बघुनी तया जलकणा तद्वृत्ति स्थीरावली,
हो आभास मना, मृत स्वसाखिची ती शुभ्र दंतावली,
'मातें केळि करावया प्रिय-सखी हांसून बोलाविते',
वेगें आंत शिरे, दिसे क्षणच तो, गेला कळेना कुठें.

*                    *                    *

नाचे हास्य मुखीं प्रशांत, असली ये तेथ दिव्याकृती,
शीर्षीं शुभ्र जटा, प्रकाशवलयें कांती मुखाभोंवतीं,
"नाहीं रंग तसेंच रूप अथवा आकार कांहीं जया,
ऐसें जीवन बिंदुरूप, चकतों त्यालाच पाहोनिया.

जैशी वृत्ति तशीं अनंत दिसतीं रूपें अम्हां हीं जरी,
आहे सत्त्वच एकलें विनटलें या पद्म-पत्रावरी,
पाहोनी मनिं कल्पना विहरती एकाच वस्तुप्रती,
होतां विभ्रम बुद्धिमान जनहीं खातात गोते किती.

विश्वाच्या अणुरेणुमाजिं भरला आहे जगज्जीवन,
त्याचा अंशच वस्तुमात्र नटवी देई जगा जीवन
जीवात्मा परमेश्वरांश परि तो भिन्नस्वरूपीं नटे,
विश्वीं एकच तत्त्व, ज्यांत विलसे तद्रूप तें दावितें.

रूपें भिन्न जरी अम्हांस दिसती, हा आमुचा दृग्भ्रम,
चित्ता तत्त्व कळे न तें बकतसे, हा, तो, तुझें, तें, मम,
मायेचा पट फाडुनी मनुज जो जाणील अंतर्हित,
सत्तत्त्वाप्रति धन्य तोच जगतीं, पावे अनंताप्रत."

* * *

## वेणु वाजेना

वेणु वाजेना — सूर घुमेना
हृदयाची दिली साद — नाद निघेना.
घालुनिया रान पायीं — धुंडाळिल्या दिशा दाही
जरी वेणुलाभ होई — वेणु बोलेना.
संसाराच्या अटवींत — मंजुस्वन घुमवीत
मोदें फिरावें नाचत — नाद निघेना.
वठलेल्या तरुलता — सूर घुमवुन आतां
हांसवून हसूं स्वतां — नाद निघेना.
गोड गोड वेणु-स्वरें — आकाशींच्या पांखराला
बोलवीन खेळायाला — नाद निघेना.
घुमवून वेणु-स्वर — काळे भयाण डोंगर
बनवावे हिरवेगार — नाद निघेना.
केल्या जरी नानापरी — तरी मूक ही बांसरी
खिन्न झालों मी अंतरीं — नाद निघेना.
बळें फुंकर घातली — वेणु बोलाया लागली
नादें वृत्ति गोंधळली — सूर जुळेना.
त्यागवृत्ति उसळली — शिळेवर आदळली
क्षणीं बांसरी फोडिली — वेणु बोलेना.
केला स्वतां वेणु-नाश — पश्चात्ताप हो मनास
जुळविलें तुकड्यास — वेणु बोलेना.
बांसरीचा लागे ध्यास — भग्न हृदय उदास
मृत्युवीण नसे आस — वेणु बोलेना.

* * *

## आशादेवि

क्लेशराशी हृदयास नित्य जाळी,
संकटावलि जरि कोसळते भाळीं,
देह देवी, दुःखांत पिचुनि जाई,
सुसह सर्वहि तुजमुळें परी होई.

जरी जीवाचें वाळवंट होई
धांव मानव तरि तुझ्याकडे घेई,
पडे कंठीं दृढ जरी मृत्युपाश
तरी लागे सारखा तुझा ध्यास.

पुढें जेव्हां तव मूर्ति उभी राही
क्षणीं मानस गे, दुःखमुक्त होई,
रूप सुंदर पाहून तुझें देवी,
स्फुरे विक्रम, उत्साह, तेज देहीं.

सहज लीलेनें रम्य चित्रमाला
काढुनीया तूं दाविसी अम्हांला,
लुब्ध होतों, धांवतों धरायाला,
खेळवीसी तूं बाळ — मानवांला.

दुःखदायक गतकाल विसरण्याला
तूंच शिकविसि गे आमुच्या मनाला,

स्वर्गसौख्याची ओढ मधुर भावी
कोण हृदयाला तुझ्यावीण लावी ?

विश्व सारें लागलें तुझ्या ध्यानीं,
तुझ्याविण नच आधार तया कोणी.
तुझी हृदयांतिल मूर्ति नष्ट होई,
प्राण फेकुनि तरि सुज्ञ मनुज देई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ७०५८

## प्रीतीचा पाश

तप्ता ह्या धरणीस शीतल-जलें शांति क्षणीं दे घन
दे शांती कृषि-कर्म-तत्पर-जना टाकोनिया जीवन,
आगीचे उठतात लोळ बघती आकाशही खावया,
ते एका निमिषांत शांत करण्या सामर्थ्य आहे तया.

तेजाची खनि मूर्त अग्नि असली बाला परी गोजिरी
पोटीं नित्य वसे, न मेघ विझवी, नाचे हंसे अंतरीं,
जाई विस्मरुनी खुळा निजगुणा विद्युल्लता पाहुनी,
सारा विक्रम मान अर्पण करी, प्रेमामुळें मोहुनी.

***

# दावा प्रेमनिवास

मिथ्या प्रेमाभास — नको, कुणि दावा प्रेमनिवास.

स्वच्छंदानें खेळे तटिनी,
धांवत जाई गिरी लंघुनी,
मार्गीं भेटे जलधि येउनी,
मिथ्या-प्रेमाभास — नको, कुणि दावा प्रेमनिवास.

नलिनीभंवतीं मधुकर जमती,
नाचत फिरती गाणें गाती,
धडपड सारी मधुकरितां ती,
स्थान नसे प्रेमास — कुणी मज दावा प्रेमनिवास.

लता कोंवळी हवा आसरा,
संनिध वाढे उंच तरु बरा,
वेढी लतिका तया तरुवरा,
प्रीतीचा उपहास — नको, मज दावा प्रेमनिवास.

रात्र पसरली चंद्र उगवला,
निशानाथ त्या आम्हीं केला,
प्रिया, प्रेय तीं भ्रम आम्हांला,
प्रेमाचा आभास — नको, कुणि दावा प्रेमनिवास.

स्वच्छंदानें नाचे चपला,
बेपर्वा लहरीहि चंचला
मेघ रडतसे सदा, पोळला;
जाळी प्रेम जिवास — कुणी मज दावा प्रेमनिवास.

अनंग सारे विवाह जुळवी,
परस्परावर सुख-जीवनहीं,
स्वसुखास्तव मधुभाव दाखवी,
प्रेम करिल कां वास ?— कुणी मज दावा प्रेमनिवास.

सत्प्रेमाचा महिमा मोठा
तेंच चालवी साऱ्या जगता
( श्रमलों ऐकुनि नसे शांतता )
प्रेमसाक्ष जें पटाविल चित्ता
होइन त्याचा दास — कुणी मज दावा प्रेमनिवास

* * *

# हृदय भग्न झालें

चित्र रेखाया बसे कलावंत,
फिरवि फलकीं कुंचला कुशल हात,
क्षुधा-तृष्णा विसरला सर्व कांहीं,
झटे रात्रंदिन — चित्र पूर्ण होई.

कलादेवी चित्रांत मूर्त वाटे,
बघुनि होई मनिं समाधान त्यातें,
क्षणोक्षणिं तो तें कलाचित्र पाही,
प्रतिक्षणिं त्या आनंद नवा होई.

चित्र बघण्याला रसिक-गणहि आला,
आणि बघुनी चातुर्य, तुष्ट झाला,
मोद त्याच्या हृदिं अननुभूत होई,
कलावंताचें स्तुतिस्तोत्र गाई.

छटा भावाच्या रमविती कुणाला,
रंग–कौशल्यें मुग्ध कुणी झाला,
कुणा अभिनव कल्पना मोहवीते,
पार्श्वभूमी कोणास रम्य वाटे.

* * *

चित्र बघुनी मुरडिलें नाक कोणीं,
वीष हृदयीं, दृष्टींत ये दिसोनी,
पदाघातें तो उधळि रंगपात्र,
क्षणीं एका विद्रूप होय चित्र.

चित्तशांतिस्तव चित्र पहायाला,
चित्रकर्ता सोत्कंठ तिथें आला,
काय दिसलें? —डोळ्यांत अश्रु आले,
कलावंताचें हृदय भग्न झालें.

* * *

# पांखरास

कां व्यर्थ पांखरा तडफडसी ?
रे रात्रदिन कां फडफडसी ?
तडफड, जळफळ उगाच तव ही
भवितव्य तुझें बदलत नाहीं,
सुटावयाचा मार्ग न कांहीं,
मग धडपड कां ही चालविसी ?
चतुराईनें जाळें विणलें
यत्न करुनिया तुला पकडिलें
पिंजऱ्यांत ह्या खगा कोंडिलें,
सोडणार, आशा व्यर्थ अशी.
आदळतां तव तुटेल रे शिर,
धडपतांना फुटेल रे उर,
गळून पडतिल पंखहि सुंदर,
कां जाळिसि काया मृदुल अशी ?
व्यर्थ न जातिल परि तव हाका,
हवीं आणखी मधुर फळें का
मेवा आणिक देउं का सुका
मिळणार तसा नच वनिं तुजसी.
म्लानदीन मुख कां दावावें ?
मिळेल त्यांतच सुख मानावें.
द्याया अन्या मोद झटावें,
मनिं हितकर जाणिव ठेव अशी.

* * *

## प्राणविसावा (१)

तोच एकला प्राणविसावा,
इतरा कर मम केंवि मिळावा?
अबला-काया दुबळी जरि ही,
एक पौरुषच हृदय विमोही,
विक्रम उसळे ज्याच्या देहीं,
दासी त्याची, करीन सेवा.
अनाथ सतिचा होइल वाली,
पराक्रमाची करुनि सावली,
रक्षिल त्यांची दौलत दुबळी,
ओवाळिन त्यावरुनी जीवा.
बाहुबलानें हतबल करुनी,
आणिल जो रिपु मत्त बांधुनी,
दास करुनि त्या नमविल चरणीं,
त्यानें कर मम करीं धरावा.
निज-दुष्कृतिनें कुजन हे किती,
रूप रजनिचें, दिवसा देती.
विक्रमरवि जो प्रचंड दीप्ती,
नाशिल तम, त्या देह वहावा.
नरराक्षस जे माजले करी,
लोळविल त्या खरतरनखरीं,
उरोभाग जो फोडील हरी,
हृदयसूर तो घुमविल पांवा,
तोच एकला प्राण-विसावा.

* * *

## प्राणविसावा (२)

तोच एकला प्राणविसावा
इतरा कर मम केंवि मिळावा ?
पवित्र हृदयाच्या सिंहासनिं
स्थापिल जो मज देवी मानुनि,
स्थान न इतरा माझ्यावांचुनि
तोच मनाचा मालिक व्हावा.
स्वरूप पाहिल जो हृदयांचें,
सुरूप दाविल जो हृदयाचें,
जिवलग होऊं परस्परांचे,
भेदभाव नच जेथ उरावा.
सुखदु:खासी समरस होइल,
हृदय माझिया हृदयीं मिळविल,
अस्फुट मनिचे भाव ओळखिल,
त्यानें कर मम करीं धरावा.
भाव-तरूचा उगवे अंकुर,
प्रेमसुधा जो शिंपिल त्यावर,
सान रोपटें होइल तरुवर,
भावसुमन त्या वाहिन देवा.
रक्षिल माझी दुबळी काया,
वाहिन ती मी त्याच्या पाया,
होउन राहिन त्याची छाया,
मैना मी तो माझा रावा,
तोच एकला प्राण-विसावा.

* * *

## प्रथम दर्शन

आज प्रथम मज दर्शन घडलें,
क्षणीं तया मीं ओळखिलें.

नजरेला जों नजर मिळाली,
युगायुगांची ओळख पटली,
क्षणभर हृदयीं खळबळ झाली,
चित्त अनावर बावरलें.

कुंजवनीं जो चुकवुनि लपला,
धुंडी ज्याला राधा-बाला,
आज तिचा हरि तिला मिळाला.
जवळी आला भाव-बळें.

आनंदाचें लोटे आउर,
हर्षित भासे मला चराचर,
शुद्धबुद्ध नच उरली क्षणभर,
दोन जिवाविण जग नुरलें.

धांव घेउनी मुख चुंबावें,
दृढ आलिंगुनि हृदयिं धरावें,
आस तीव्र परि काय करावें?
लाज-भिडेनें चांचरलें.

चित्तवृत्ति थाऱ्यावर आली,
माझी मजला लाज वाटली,
शुद्ध मला पदराची झाली,
गळल्या पदरा सांवरिलें.

वाटत होतें जीवित अपुरें
दृष्टिस पडलें वदन गोजिरें,
हुरहुर, तळमळ झणीं ओसरे
दुबळ्या हृदया बल चढलें,
क्षणीं तया मीं ओळखिलें.

* * *

## हृदय तुझें खोल

हृदय तुझें खोल — बाळे,
एक शब्द बोल — ज्याचें
जीव गडे मोल.
कृष्णघनांतिल चंचल बिजली,
नयन-घनीं तव दिसे विनटली,
नाचते विलोल — चपला.
इंद्रधनूची जादु बहरली,
भ्रूधनुवरि तव, दृष्टि विरमली,
आयु गमे फोल — तुजविण.
गगनपटावर बालरवीसम
विशाल भालीं विलसे कुंकुम,
दृश्य नव अमोल — दिसतें.
रविरायाला बघुनि पळाली
उषा जाउनी लपली गालीं
लाल गाल गोल — दिसती.
निधान हें नव-सौंदर्याचें,
कलाचित्र विधि-कुशल-कराचें,
बघुनि चित्त लोल — होई.
असीम नभ हें ठाव कळेना,
नयन-नभीं हृद्भाव कळेना,
दृष्टि तुझी खोल — बाळे,
एक शब्द बोल —
ज्याचें जीव गडे मोल.

* * *

# चुकविसि कां तूं मला

वदन चंद्र आपुला — लपवुनी
चुकाविसि कां तूं मला ?
रवी उगवतां काय पद्मिनी
लपते पानाआड जाउनी ?
कां मग लपविसि पदर ओढुनी
वदनावरची कळा ? — सखे कां,
कवटाळुनि तरुवर हृदयाला
फिरफिरुनी त्या चुंबायाला
मोद होतसे किति लतिकेला
प्रेमरीति परि तुला — कळेना.
गुंगत संनिध मधुकर येई,
हर्षे कमलिनि वेडी होई,
ओढुनि त्याला हृदयीं ठेवी,
प्रेमरीति परि तुला — कळेना.
ओळखिलें तूं मज, मी तूंतें,
हृदयाला कळलें जें नातें,
मान्य होय तें गुरु-वडिलांतें,
कां मग संकोचला — जीव तव ?
लपंडाव हा पुरें जाहला,
आवडतें तें करावयाला,
हृहयभावना पुरवायाला,
टाक पुढें पाउला — सखें कां
चुकवितेस तूं मला ?

* * *

## पाहूं नको हें असें

पाहूं नको हें असें — अनावर
हृदय गडे, होतसे.

जातां जातां मान वेळुनी
हळूंच बघसी तिरक्या नयनीं,
हृदयभृंग क्षणिं गुंग होउनी
नयनकमलदलिं फसे — अनावर हृदय गडे, होतसे.

केव्हां तिरपी भुवई उचलुनि
उन्मादक गहिऱ्या नयनांतुनि
कटाक्ष भेदक फेंकिसि सजणी,
बाण उरीं खुपतसे — अनावर हृदय गडे, होतसे.

यौवनानुकुल करितां चाळे,
वटारून तूं दोन्ही डोळे
दटाविसी मज, तेव्हां बाले—
और मजा येतसे — अनावर हृदय गडे, होतसे.

* * *

# दाव आपुली कळा

दाव आपुली कळा — करुनिया
कंठ गडे मोकळा.
बाहेरुनि गे शिरतां सदनीं
गीत मनोहर आलें श्रवणीं,
सूरसुधेची दिव्य मोहिनी;
जीव गुंग जाहला — सखे गे,
परी जों न मी शिरलों सदनीं
उठलिस वीणा दूर सारुनी,
गीत-निर्झरी गेली सुकुनी,
कां गे, बघतां मला ? — सखे गे,
स्वैर घेतली तान गुंगुनी,
स्वैर मोकळ्या वातावरणीं
गोड लकेरी घुमते अजुनी,
संभ्रम परि वाटला — तुला कां ?
वसंतागमीं मुदें कोकिळा
मुक्त करितसे गळा आपुला,
मूकपणा परि या समयाला
कां तूं स्वीकारिला ? — सखे गे,
तूं मम कोयळ वसंत मी तव,
एक लकेरी घेउनि अभिनव,
नाद लहरिवर अणुअणु नाचव,
दाव आपुली कळा
करुनिया कंठ गडे, मोकळा.

* * *

## ठेव दूर वीणा

भावगीत थांबव बाले, ठेव दूर वीणा,
हृदयभाव व्यक्त कराया शक्त तें असेना.

सूर कोकिळेहुनि तव गे, जरी मोददायी,
स्वरालाप ऐकुनिया जरि चित्त दंग होई,
मधुर शब्द वेंचुनि लिहिलें गीत गोड देवी,
भाव तुझ्या हृदयांतिल तें व्यक्त तरि करीना.

गोड भाव ओठावरि तव दिसे थरकतांना,
प्रेमभाव नयनीं दिसतो जो तरंगतांना,
रम्यभाव वदनीं तुझिया दिसे विलसतांना,
शब्दसूर जड हे केवळ त्यास दावितांना.

भाव मधुर जो गे, तुझिया मुखीं करी केली,
कुशल विधी रंगवुनिया तोच दावि गालीं,
तोच बघे लिहिलेला मी भव्य तुझ्या भालीं,
रम्यभाव कळवाया तो गीत शक्त हें ना.

शब्दसूर व्यर्थ तयांची कशाला बढाई,
नको असें गाणें सखये, स्तब्ध बसुनि राही,
मुखावरिल वाचित बसतों गोड गीत मीही,
हृदयभाव सहजचि कळती मग परस्परांना.
भावगीत थांबव बाले, ठेव दूर वीणा.

* * *

## साशंक

जन अस्थिर सारे बुध म्हणती,
कां प्रेमाची तव तीच गती ?

सों सों वारा वाहे क्षणभर,
उठे वावटळ खाई स्थिरचर,
धांवत जाई कोठें सत्वर,
नच ठाव कळे, हो काय गती ?

तारा चमके स्वयंप्रकाशी,
हंसवी लावी ओढ जिवासी,
मार्ग दाखवी जों दुबळ्यासी,
तों लपते, दिसते फिरुनि न ती.

नटतें जग जों वसंत येई,
ग्रीष्मीं परि तो विलीन होई,
माधुर्याचें नुरे नांवही,
कां प्रेमहि अस्थिर वद जगतीं ?

शितें तोंवरी भुतें भोंवतीं,
मधु तोंवरि मधुकर गुणगुणती,
यौवन बघतां उपजे प्रीती,
कां प्रेम विटे सरतां नवती ?

स्फटिकासम जल दिसे नदी-तळ
गढूळेल झणिं तरंग उठतिल,
मन पाण्याहुनि पातळ चंचल,
तव पालटेल कां विमल रती ?

भार टाकुनी पूर्ण तुझ्यावर
लाथ मारिली सर्व जगावर,
फिरे तुजसवें मी वाऱ्यावर,
कां डागळेल तव विमल मती ?
जग अस्थिर सारे बुध म्हणती.

* * *

# समाश्वासन

नि:शंक मनें कर देइं करीं,
नेईन सांवरुनि पैल तिरीं.
वीज कडाडो, मेघ गडाडो,
धो धो गर्जत पाऊस पडो,
माथ्यावर आकाश कडाडो,
क्षण आलिंगन नच सोडुं परी.
सरितेचें जल तुफान खवळो,
लाटा उसळो, आकाश गिळो,
क्षणोक्षणीं गे, नाव डळमळो,
कर घालुनि कंठीं हांसु परी.
सोसाट्याचा वारा वाहो,
धूळीनें जग सारें न्हाओ,
धूळ नयनिं, जन अपणां पाहो,
चल, पर्वा त्यांची कोण करी?
मार्गीं येओ कृष्णसर्पही,
दांत पाडुनी तुडविन पायीं,
फणा ठेंचुनी रडविन धाई,
धर बळकट कर, नच भीति धरी.
निंदा सारे लोक बडबडो,
भुंकत येओ श्वान ओरडो,
वृद्धा साध्वी बोटें मोडो,
उपहासुनि पाहूं खेळ परी,
नि:शंक मनें कर देइं करीं.

* * *

## विपर्यास

हो शांत सागरीं खळबळ रे ?
लागली मनाला तळमळ रे ?
प्रीतीनें मज हांक मारिली,
पर्वतावली मार्गीं आली,
हृदयानें परि धांव घेतली,
गिरि उल्लंघुनि, घे भेट त्वरें.
जिवाशिवाची खूण जों पटे
बाहिर पडलें सोडुनि घरटें,
काय दिसे जनतेला उलटें ?
कां भलतें चित्तीं मूळ भरे ?
जनता-वाणी कानीं पडली,
" वडिलांनीं बहु कीर्त मिळविली,
यानें दिवटी परि पाजळली "
मजसाठीं तव हें मोल ठरे !
" पहा पहा ही उठवळ बिजली,
सतिच्या पोटीं गार निपजली,
जनकमुखा काजळी फासली "
ऐकुनि पडती हृदयास घरें ?
चुकुनि मूल कुणि जवळी येतां,
ओढुनि नेई सवेंच माता,
मार त्या मिळे जातां जातां,
कां मानिति मज त्या लाव बरें ?
हो शांत सागरीं खळबळ रे ?

* * *

## सांत्वन

काय अशा जनतेस म्हणावें ?
तिजसाठीं कां व्यर्थ रडावें ?

रामकृष्णही हिनें निंदिले,
हरी-हरासहि दोष लाविले,
वाळिंत ज्ञानेशादि टाकिले,
आज तिनें शिरिं त्यांस धरावें ?

आगींत जिनें दिव्य पटविलें,
सीता-सतिवर वीष ओकिलें,
वणवण रानीं तिला फिरविलें,
आज वंदिते सतिला भावें ?

राधा पुतळी भावभक्तिची,
दृष्टि अंध परि गे, जनतेची,
पतिला भलतें सांगुनि जाची,
शंकित निर्मळ हृदय करावें ?

ज्यास तुडविलें पायाखालीं
हृदयिं हिनें तन्मूर्ति ठसविली,
भंजक दिसतां तिज, अवकालीं
सिंचुनि निजरुधिरा जगवावें !

स्वैरपणें ही जयास निंदी,
भाव-भक्तिनें त्यासच वंदी,
काळ तियेची उतरी धुंदी,
अविचारी, तिज कां मानावें ?

चोर लुटारू म्हटलें ज्याला,
बंडखोर जो हिला वाटला,
दिव्य विभूती मानुनि त्याला,
आज हिनें गुण त्याचे गावे!

भल्याभल्यांची करी टवाळी,
कथा काय मग सखे, आपली,
पाप-कल्पना मना न शिवली,
मग लक्ष तिजकडे कां द्यावें?

प्रीतिबद्ध गे, होउनि आपण,
परस्परां अर्पियलें जीवन,
जनतावाणी ऐकुनिया क्षण—
सौख्याचे गे, कां दवडावे?
काय अशा जनतेस म्हणावें?

* * *

# विनवणी

(आपल्या चुकीबद्दल प्रियव्यक्तीनें स्वीकारलेली उदासीनता
तिच्या कोपापेक्षां असह्य-तर असते.)

नको अबोला असा धरूं हा बोल एकदां गडे
तळमळे हृदय कोसळे रडे.

मधुरसवंती तुझी पडूं दे कानांवर एकदां,
शेंकडों साहिन मग आपदा.

मधु बोल नको मज वद गे, कांहींतरी,
कटुशब्दें चुरशिल हृत्कुसुमाला जरी,
तरि गमेल तें प्रिय याहुनि मज सुंदरी,

नको अबोला, हृदयमंदिरीं आग भडकली असे,
जाहलें मन्मन वेडेंपिसें.

दृष्टिक्षेपें तुझिया फुलतिल शुष्क साजणी, लता,
तींत कां आज भरे शून्यता ?

उजाड रानें तव सहवासें उद्यानें बनतिल,
खिन्न कां वदनचंद्र निर्मल ?

मी चळतां त्वां मज शुद्धीवर आणिलें,
मी चुकतां मज त्वां प्रेमें समजाविलें,
मज खडा बोंचतां अश्रु तुझे सांडले,

उदार-हृदये, आज तव कुठें प्रेमळता लोपली ?
कोठची निष्ठुरता वरियली ?

मम विरहाचा क्षणहि जाहला असह्य पूर्वीं तुला,
झटुं नको चुकवाया अजि मला.

सोडुनिया निश्वास दीर्घ, मम हृदया जाळूं नको,
प्रेमले, प्रेमा विसरूं नको.

कां खिन्न-दृष्टिनें बघसी दासाकडे,
मधु-दृष्टि मज नको प्रेमाची तव गडे,
तूं पहा एकदां रागानें मजकडे,

बोल कटुतरी बोल खोल गे, हृदय एकदां तरी,
त्याहुनी स्वर्ग तुच्छ सुंदरी.

* * *

## दावी दिलदारी

नैनांतुनि नारी, तिरक्या, तीर विखारी
मारून जिव्हारी !
घायाळ कसा टाकुनियां चित्तचकोरी,
झालीस फरारी !
जातां क्षणीं तूं, या दुनियेंतील खुमारी,
हो नष्ट बहारी !
दासावर कां निष्ठुर होऊन किशोरी,
जासी दिलप्यारी !
अप्राप्य मिळे श्रेय करी प्राप्त शुभांगा,
वांच्छी चिर-संगा !
माझ्यास्तव ये भूतलिं वाटे सुरगंगा,
माझी दिलरंगा !
एका घटकेच्या सहवासांत जिवाला,
लावून जिव्हाळा !
गेली हृदया लावुन अंगारहि, अंगा—
कापून दुभंगा !
मोदें विहरावें सुख-शैलावर आतां,
-तों खाउनि गोता !
पाताळ-दरी खोल पडे तींत अभागी,
तूझा अनुरागी !
तैं नंदन भासे जग, सर्वत्र फुलोरा,

हो आज सहारा !
अत्युष्ण सदा वाहतसे वात भरारा,
कोठें न निवारा !
कां कोमल देहीं मन गे फत्तर-गोटा ?
पुष्पीं जणुं-कांटा !
देवालयिं उच्चासनिं कां देव नसावा !
सैतान दिसावा !
मागेन गुन्हेगार जरी मी तव माफी,
व्हाया दिलसाफी !
ये माग, तुला काय हवा सांग खुलासा,
देईन दिलासा !
झालों न कधीं दीन असा मी गुणखाणी,
होतो अभिमानी !
जाई बघतां वाट तुझी धीर तुटोनी,
ये प्राणहि नैनीं !
येशील मना वाटतसे आस अजूनी,
सारें विसरूनी !
पुष्पें पसरोनी सजवील्या तव वाटा,
दे दर्शन आतां !
ठेवी करुनी स्वागत-सत्कार तयारी,
मी तिष्ठत दारीं !
बेचैन तुझ्यावांचुनि या भव्य महालीं,
अश्रू नित गाळी !

फाटे दिल, पोळे तनु, पाहीं भवतालीं,
जों या अवकाळीं !

हें दुःख न हा सूळच काळीज विदारी,
घे एक भरारी !

ये हांसत घेऊन सुधेची करिं झारी,
दावी दिलदारी !

प्रेमें तव वाहीं पदिं सारी मम मत्ता,
ये चालव सत्ता !

आतां तरि धांवे, फुटुं दे पाझर चित्ता,
हातीं धरि हाता !

केलें तुजसाठीं हृदयाचें अभिरामे,
हें तख्त रिकामें !

ये बैस तिथें गे, तुज सारी मुखत्यारी,
येई पण प्यारी !

* * *

## याचना

तुझ्यावीण जीवित अपुरें भामिनी, असे गे,
विसर काय झालें तें, ये धांव सानुरागें.

भुतापरी फिरतों सजणी, एकटा महालीं,
वस्तुमात्र सुचवी दिन जे सुखद पूर्वकालीं,
व्याकळून मन, ओघळती नित्य अश्रु गालीं,
काय सखे, कायमचें तें सुखस्वप्न भंगे ?

सतार ही गंजुनि तारा जाहली निकामी,
स्नेहयुक्त फिरवुनि कर गे, सूर घुमव नामी,
विश्वगोल डोलव सारा नाद-रस-ऊर्मीं,
गान-लहरि उसळवि हृदयावरी गीतगंगे.

तुझ्यावीण बावरलीं गे हरिण-बालकें हीं
सोडुनिया चैरापाणी खिन्न शून्यगेहीं,
तुझ्यापरी नयनें त्यामधिं, तेज नुरे कांहीं,
हृदय-शुष्क बनलें कैसें तुझें प्रीतिगंगे ?

तुझी कृपा-छाया ज्यांवरि दुःख-ताप-हारी
मातृहीन हंबरतीं हीं वासरें बिचारीं.
तुझी बसायाची जागा धुंडितात सारीं,
कवळ त्यांस घालाया ये, धांव घेइं वेगें,

गावयास नाचाया तूं शिकविलें जयाला,
त्यजुनि तया जातां तूं तो मूक शुक जहाला,
जरा कुठें चाहुल येतां बघे त्या दिशेला,
नृत्य-गीत-जीव तयाचा जाय तुझ्या संगें.

समोंवतीं अवसेची गे, काजळली रात,
जीव-दीप पडला, नाहीं स्नेहवात त्यांत,
ज्योत लाव, उजळ दिशा गे, उजळ मनःप्रांत,
येउनि जग रंगव माझें, प्रीति-पूर्व-रंगें !
तुझ्यावीण जीवित अपुरें भामिनी, असे गे.

* * *

## कुसुमायुधास

हे कुसुमायुध, शर मार उरीं,
ही चंचल हरिणी विद्ध करी.
शराघात तव होतां मदना,
क्षणीं पडे रे, भूल मम मना,
रात्रंदिन तव लागे भजना,
रे भक्त-कामना पूर्ण करी.
यौवन–मुग्धा बघ ही रमणी,
स्वच्छंदानें फिरे उपवनीं,
बेपर्वाई भरली नयनीं,
का विफल शर तुझा तिच्यावरी ?
जितेंद्रियांसहि तुवां नमविलें,
देवादिकही तुवां भ्रमविलें,
कौशल तें तव कोठें गेलें ?
अभिमान तुझा ही व्यर्थ करी.
अधिराया तूं एक त्रिभुवनीं,
विश्व लागलें तुझिया भजनीं,
सत्ता ही परि तव नाच मानी
शर फेंक, जखम करि खोल उरीं.
निर्वाणीचा बाण जोडुनी,
कुसुमचाप आकर्ण खेंचुनी
उरोभाग तो उन्नत लक्षुनि,
शर सोड तुझा रे मृदु-जहरी.
ही चंचल हरिणी विद्ध करी.

* * *

# जाहलें जीवित सुफलित तरी

" हृदयासनिं तुज स्थापुनि देवी, सेविन रात्रंदिन,
दास तव चरणांचा होइन "

येउनिया तो वदे बोल हे, मधुर शब्द ऐकुनी,
जाय मम मानस वेडावुनी.

प्रेमार्द्र नजर तों फेकुनिया त्यावर
मीं दिला तयाच्या हातीं माझा कर,
तो ओढुनि वेगें ठेवी हृदयावर,
म्हणे " स्वामिनी सर्वस्वाची, दास आजपासुनी
तुझा मी, धन्य जाहलों जनीं, "

हृदयसागरीं स्पर्शें त्याच्या भाव किती उसळले,
खुळें मन स्वत्वाला विसरलें.

स्वतंत्र मानस, बद्ध जाहलें, नाजुक पाशीं पडे,
तयाच्या चरणीं मानस जडे.

स्थापुनी तयाची मूर्ती हृन्मंदिरीं,
निशिदिनीं उधळुनी भावसुमें तिजवरी,
मी स्वतः तियेची पूजा निशिदिनिं करी.

दासी होउनि मीच तयाची सेवा आतां करी,
जाहलें जीवित सुफलित तरी.

* * *

## प्रीति

कोणी बोलति सर्व विश्व जड हें प्रेमामुळें चालतें:
प्रेमा त्यांत जरी न लेश असतां निर्जीवसें चित्र तें.
प्रेमानें जग चालतें सकल? छे! न्याया तयाला लया,
धाता प्रीति-विषास निर्मित असे, वाटे मना माझिया.

आनंदें सुम बालकांस बघुनी डोले सदा जी लता,
नेलें हाय! खुडूनि दुष्ट पवनें साऱ्या तियेच्या सुता,
लोपे हास्य तिचें मना रमवितें, प्रेमामुळें शोभना,
दुःखानें जळते, कुणी हंसवि कां आतां तियेच्या मना?

ज्यानें आजवरी अनेक समयीं केलें तिच्या रक्षणा
घेओनी उडि आपदांत भयदा आधार जो जीवना,
जाई सोडुनिया जगा तरुसखा, जो प्राण वाटे तिला,
प्रेमाच्या विरहें मरून पडली भूमीवरी प्रेमला.

जीवापाड जयावरी वसतसे प्रेमा, तया नेउनी,
धाता ठेवि दुजास हाय! जगतीं शोकें जळे जो मनीं.
प्रेमाचा जगतांत खेळ जहरी चाले, तरी मानव
जो तो आपण होउनी उडि सदा टाकीत प्रेमास्तव.

माया-प्रेम तयास घेउनि सवें ईशें जगा निर्मिलें,
विश्वाला सगळ्या भरून उरलें, देवादिकां ना कळे,
विश्वामित्र-वसिष्ठ-राम सगळे, प्रेमांतरीं रंगले,
देवा, मानव हा अजाण मग तो प्रेमांत कां ना चळे?

* * *

## सहज मग

हृदयसागरा मिळावयाला ओढ जिवा सारखी
लागली, धांवे सरितासखी,
अडवाया तिजला मार्गीं पर्वत खडे,
रोधिती पथ, दऱ्या, फत्तर, भीषण कडे,
धांवते तरि सदा सरिता जलधीकडे,
आवेगानें तुडवुनि सकलां धांवत जाई पुढें,
सहज मग आशापूर्ती घडे.

दृष्टि ठेवुनी नभीं बसे हा चातक तृष्णाकुल,
पिईना महिवरचें कधिं जल.
किति सुधामधुर जल निर्झर हे धांवती,
नद–तडाग त्याला प्रेमें जल अर्पिती,
जाळतो ग्रीष्म तरि अढळ चळेना मती,
तपश्चरण फल लाभे अंतीं, वर्षर्तू ये पुढें
सहज मग आशापूर्ती घडे.

ग्रीष्म तापतो रडे कोकिळा एकांतीं जाउन,
स्मरुनिया वसंत रात्रंदिन.
करि तृप्त जगा घन वर्षुनि जल शीतल,
शरदश्री नटतां हंसे सकळ भूतल,
परि मूक कोकिळा उदासीन व्याकुळ,
वसंत येई हांसत, पसरित मग सुमनांचे सडे,
सहज मग आशापूर्ती घडे.

## प्रीति

कोणी बोलति सर्व विश्व जड हें प्रेमामुळें चालतें:
प्रेमा त्यांत जरी न लेश असतां निर्जीवसें चित्र तें.
प्रेमानें जग चालतें सकल ? छे ! न्याया तयाला लया,
धाता प्रीति-विषास निर्मित असे, वाटे मना माझिया.

आनंदें सुम बालकांस बघुनी डोले सदा जी लता,
नेलें हाय ! खुडूनि दुष्ट पवनें साऱ्या तियेच्या सुता,
लोपे हास्य तिचें मना रमवितें, प्रेमामुळें शोभना,
दुःखानें जळते, कुणी हंसवि कां आतां तियेच्या मना ?

ज्यानें आजवरी अनेक समयीं केलें तिच्या रक्षणा
घेओनी उडि आपदांत भयदा आधार जो जीवना,
जाई सोडुनिया जगा तरुसखा, जो प्राण वाटे तिला,
प्रेमाच्या विरहें मरून पडली भूमीवरी प्रेमला.

जीवापाड जयावरी वसतसे प्रेमा, तया नेउनी,
धाता ठेवि दुजास हाय ! जगतीं शोकें जळे जो मनीं.
प्रेमाचा जगतांत खेळ जहरी चाले, तरी मानव
जो तो आपण होउनी उडि सदा टाकीत प्रेमास्तव.

माया-प्रेम तयास घेउनि सवें ईशें जगा निर्मिलें,
विश्वाला सगळ्या भरून उरलें, देवादिकां ना कळे,
विश्वामित्र-वसिष्ठ-राम सगळे, प्रेमांतरीं रंगले,
देवा, मानव हा अजाण मग तो प्रेमांत कां ना चळे ?

* * *

## सहज मग

हृदयसागरा मिळावयाला ओढ जिवा सारखी
लागली, धांवे सरितासखी,
अडवाया तिजला मार्गीं पर्वत खडे,
रोधिती पथ, दऱ्या, फत्तर, भीषण कडे,
धांवते तरि सदा सरिता जलधीकडे,
आवेगानें तुडवुनि सकलां धांवत जाई पुढें,
सहज मग आशापूर्ती घडे.

दृष्टि ठेवुनी नभीं बसे हा चातक तृष्णाकुल,
पिईना महिवरचें कधिं जल.
किति सुधामधुर जल निर्झर हे धांवती,
नद–तडाग त्याला प्रेमें जल अर्पिती,
जाळतो ग्रीष्म तरि अढळ चळेना मती,
तपश्चरण फल लाभे अंतीं, वर्षर्तू ये पुढें
सहज मग आशापूर्ती घडे.

ग्रीष्म तापतो रडे कोकिळा एकांतीं जाउन,
स्मरुनिया वसंत रात्रंदिन.
करि तृप्त जगा घन वर्षुनि जल शीतल,
शरदश्री नटतां हंसे सकळ भूतल,
परि मूक कोकिळा उदासीन व्याकुळ,
वसंत येई हांसत, पसरित मग सुमनांचे सडे,
सहज मग आशापूर्ती घडे.

ध्येयावरतीं भाव ठेवुनी, झटतों रात्रंदिन,
सुचेना दुजे मना त्याविण.
भोंवतीं दाविती मोहवस्तु दर्शना,
नच शक्ति तयांला मोहविण्याला मना,
नच चळावयाची विशुद्ध जर भावना,
एकनिष्ठ ठेवुनी भाव मी जाइन ध्येयाकडे,
कां न मग आशापूर्ती घडे ?

* * *

## तुझें सामर्थ्य

तव दृष्टि फिरतसे जयावरी,
नव दिव्य रूप तें क्षणीं धरीं.
भोंवतालच्या ह्या सुकलेल्या,
तरुलतिका गे आज बहरल्या,
फळाफुलांनीं हंसूं लागल्या,
ही जादु कोण गे, अशी करी ?
जीर्ण झोपडी माझी बघुनी
धनिकांचें जग जाई दुरुनी,
पदस्पर्श तूं करितां येउनि,
प्रासाद बने ती क्षणांतरीं.
उपहासाची आंच लागुनी,
शुष्क जाहलें हृदय साजणी,
उपेक्षिती त्या जन धिक् करुनी,
तूं अमृत शिंपिलें तयावरी.
कांचमणी जो क्षुद्र मानुनी,
सारे देती दूर फेकुनी,
प्रेमें बघसी तया उचलुनी,
हो दिव्यरत्न तें तुझ्या करीं.
नैराश्याच्या ज्वाला लागुनि,
जीवन-तरु जो जाई करपुनि,
प्रेमाचें नव जीवन शिंपुनि,
बनविसी तया सुरतरूपरी.

* * *

# मोहिनी

वदनांबुज बघुनि तुझें मोद मना होई,
हृदय-भाव उसळुनि मुखिं सहज गीत येई.

नयनीं लखलखत वीज,
अधरीं थरथरत लाज,
गालीं नव मधुर साज,
सांग कुठुनि येई ?

स्मित नाचे गालावर,
मधुर सुधा अधरावर,
गोड भाव नयनांतर,
रम्य गडे दावी.

मुक्त तुझा केशपाश,
स्वैर कसा करि विलास,
गमत मला मदन-पाश,
हृदयाला मोही.

* * *

# वाटतें अतांच गेला दुरी

निरोप घेउनि सर्वांचा तो आला माझ्याकडे
म्हणे " मी येतों आतां गडे

" बालपणींचा तुझा संवगडी, निघे दूर जावया,
हांसुनी निरोप देई तया;

एकत्र खेळलों आपण रात्रंदिन,
वर्षासम गमले पूर्वी विरह–क्षण,
किती काळ जायचा आतां भेटीविण,
किति दिवसांनीं कळे न येइन येथें मी परतुनी
तरी दे निरोप मज हासुनी. "

मधेंच थबके वदतां, मुखिचें हास्य मधुर लोपलें,
तयावर गांभीर्य प्रकटलें.

धुंदकारले डोळे, पाही रोखुनि माझ्याकडे;
थरारे ऊर, हृदय धडधडे.

तों पकडुनिया कर त्यानें मज ओढिलें,
आवेगें त्याच्या हृदयाशीं कवळिलें,
मम अधरावरती अधर क्षणिं ठेविले,
हळूच सारुन दूर जाइ मग शब्दहि नच बोलतां,
क्षणाचा खेळ होय तत्त्वतां.

मुक्या मनानें, प्रेमोत्कटता त्याच्या हृदयांतली,
माझिया हृदयाला पटविली.

क्षणांत एका भोंवतालचें गेलें जग बदलुनी,
भाव नव उसळे माझ्या मनीं.

कितितरी लोटले दिवस तया जाउनी
मधुर त्या क्षणाच्या जादूनें मोहुनी,
मी आशेवरतीं कंठीं दिनयामिनी,
क्षणापूर्वि तों प्रेमचिन्ह ह्या वठवुनि अधरावरी,
वाटतें अतांच गेला दुरी.

* * *

# करपलेल्या कळीस

तूंच एक दुःखमग्न कां सुरम्य कालीं ?
नयनांतुनि ओघळती अश्रुबिंदु गालीं.

हासे बघ चांद-रात,
हांसतसे वस्तुजात,
दीनपणें कां रडसी ठेवुनि कर भालीं ?

फुलती सरिं नलिनी या
येतां नभिं शशिराया
नवजीवन दे सकलां अमृत-किरण-जालीं.

मोद-फेन ही उसळित
धांवे सरिता हांसत,
तरु-लतिका तटिं हांसत नवपुष्पें ल्यालीं.

लाभे तुज दिव्यरूप,
नमितिल तव चरणिं भूप,
दुःख काय, काय तुझा कोमल जें जाळी ?

लोभनीय रम्य कांति,
लोपे तिजवरिल दीप्ति,
कां गालावरची तव विटे उषा-लाली ?

नेत्र दिव्य रत्नमणी,
भरलें कां अश्रूंनीं ?
दृष्टिकरें तव हंसेल सृष्टि भोंवतालीं

तनु कोमल सुमन-कळी
करपें कां अवकाळी ?
विकसवील जपुनि असा नच कां फुलमाळी ?
तूंच एक दुःखमग्न कां सुरम्य काळीं ?
नयनांतुनि ओघळती
अश्रु बिंदु गालीं

* * *

## काळ–रात

मम आयुष्यावर पसरे ही असली काळरात,
घट अमृतानें भरलेला,
विष–बिंदु त्यांत परि पडला
काळकूट हो अमृताचें क्षणिं करि जें प्राणघात.

तरु फुलला फलपुष्पांनीं,
तों बिजली ये कडकडुनी,
कोळसा जाहला काळा नव-तरुचा त्या क्षणांत.

सुखशिखरीं हर्षे चढलें,
आकाश शिरीं कोसळलें,
मी दरींत पडलें येथें दुःखाच्या धूळ खात.

रतिरूप होय मज प्राप्त,
परि दैव करी आघात,
रूप नष्ट फटकाऱ्यानें हो एका दैवजात.

मधुवचनें मानस भुललें,
प्राणदान ज्यातें केलें,
कापून गळा परि त्यानें केला विश्वासघात.

हा देह घडा मातीचा,
होतांच स्पर्श भलत्याचा
तो फोडुनि फेकायाचा ठेवी कां कुणि गृहांत ?

एकदांच पाउल चुकतां
दुर्दैव घात करि पुरता,
धिक्कार-विषय सर्वांचा मी झालें जन्मजात.

अन्यथा आचरण घडलें,
(जग पावित्र्यानें भरलें)
मुख पापी लपवायाला नच जागा या जगांत.

नच सहानुभूती कोठें!
कर नसे अश्रु पुंसण्यातें!
आंसवें गाळुनी लोटी दिनरजनी कोपऱ्यांत.

* * *

# कां रडसी विभ्रमांत

अवसेची रजनी सरुनी उगवे गे, सुप्रभात.
पट दूर होय तिमिराचा,
हो सेक दिव्य तेजाचा,
तेजांत दिव्य त्या न्हाला हा सारा वस्तुजात.

घट विटाळतां मातीचा
कां फोडुनि फेकायाचा ?
तो विशुद्ध होई बाले, क्षण पडतां विस्तवांत.

तूं निर्मल–हृदया असती,
तुज फसवी पातक–राशी
कां हीन स्वतःला गणुनी जळसी दुःखानलांत ?

मधुमत्त भ्रमर करि कोणी
जरि भ्रष्ट विमल फुलराणी
करि देवहि धारण शीर्षीं ती येतां आश्रयार्थ.

ये महापूर गंगेला,
गंगौघ गढूळहि झाला,
पद प्रवाहांत टाकाया वाटे शंका मनांत—

तो महापूर ओसरतां
स्फटिकासम भासे सरिता
पापमुक्त व्हाया सारें जग न्हाई तज्जलांत.

भ्रष्ट-तनू गौतम-जाया
होतसे वंद्य जगता, या
सति-मालिकेंत तिजला लाभे स्थळ पहिलें या जगांत.

तनु भ्रष्ट म्हणुनि तळमळते,
निशिदिनीं हृदय तव जळतें,
या पश्चात्तापाग्नीनें अघ होई भस्मसात्.

जाहला जधीं अनुताप,
त्या क्षणीं नष्ट तव पाप,
मांगल्य, दिव्यता लाभे कां रडसी विभ्रमांत ?

* * *

## जादुगार

कां सजसी हृदयेश्वर, विधि–कौशल गाया ?
तुजविण विधि अन्य मला ठाउका न राया.

दिव्य रूप अर्पुनिया
क्षणिं त्यावर घालुनिया—
घाव विधी उदय सजे नष्ट तें कराया.

मानुनि मज पतित दीन
जग जाई जंव दुरून,
तारिलेंस नाथ मला तूंच येउनीया.

शुष्क हृदयदीप पडे,
गंजुनिया एकिकडे,
तुजविण नच त्यास कुणी येई उजळाया.

घालुनिया स्नेहवात
पेटविसी ज्योत त्यांत,
तम लोपे, भाविकाल लागला दिसाया.

शोकदग्ध रूप मळे,
चितानलिं देह जळे,
ये न कुणी ताराया गांजल्या जिवा या

तूंच एक जादुगार,
तूंच दिव्य चित्रकार,
कुशल–करें रंग भरुनि नटविलीस काया.

* * *

## कटु अनुभव

लाभेल प्यावया सुधा म्हणुनि झटतांना,
लागतें विषाचें पात्र हाय ओठांला.

तृष्णाकुल जीवा शमवाया जों जावें,
दुर्गंधयुक्त तों पल्वल पुढतीं यावें.

जों यत्न करावा दिव्य रत्न लाभावें,
कोळसा करीं ये, व्याकुल मानस व्हावें.

जों कल्पलतेची होइल वाटे प्राप्ती,
तों दैव दाखवी हाय पुढें कोरांटी.

सुख आम्रतरूची छाया देइल जीवा,
जावें तों पुढतीं कंटक-तरु हा यावा.

दैवाचा अनुभव असा नित्य कटु येतो,
बेचैन होउनी रात्रंदिन तळमळतों.

* * *

# योगिनी

संतर्पण हें तुझिया चरणीं,
सर्वस्वाचें केलें जननी.
वैभव सारें कधींच गेलें,
तुझ्याकारणीं सर्व लागलें
एकटीच जरि इथें राहिलें,
जाहलें खरोखर धन्य जनीं.
तुझ्या रक्षणासाठीं झटतां,
तुझ्या निशाणाखालीं लढतां
स्नुषा-पुत्र-पति सोडुनि जगता,
हांसत चढले गे, स्वर्भुवनीं.
सान्त्वनास जग भंवतीं जमतें,
सहानुभूती प्रेम दावितें,
गुणसंकीर्तन करूं लागतें,
करि कर्तव्याचें मोल कुणी.
अश्रू गाळी येउनि कोणी,
समदुःखी हा म्हणतो कोणी,
दीर्घ उसासे सोडी कोणी,
मम दुःख हराया कळवळुनी.
कसें कथूं या वेड्या जीवा !
दुःख शोक मज कां गे, व्हावा ?
कां अश्रू मम नयनीं यावा ?
कर्तव्यपूर्ति–सुख–शांति–मनीं
संतर्पण हें तुझिया चरणीं.

* * *

## निर्धार

करितों तव जयकार
निशाणा, करितों तव जयकार
तुडवुनि वैरी स्वातंत्र्याचे होउनि संकटपार
होउनि विमुक्त संकटपार
नव भारत नव तेजें गर्जुनी करितो तव जयकार
निशाणा, करि तव जय जयकार
अवसेची संपली काजळी रात्र भयानक घोर
संपली रात्र भयानक घोर
दिव्यदर्शनें तुझ्या लागला नाचाया मनमोर
निशाणा, नाचे बघ मनमोर
बघतां तुजला निनादते ही मंजुळ हृदय-सतार
निनादे मंजुळ हृदय-सतार
देहभान विसरुनी ऐकतों मधुर तिचे झंकार
ऐकतों सुमधुर नव झंकार
तूं अमुचें स्फूर्तिस्थान
तूं अमुचें आशागान
तूं धन-वैभव सन्मान
तूंच निशाणा, आझादीचा अमुच्या तारणहार
गर्जुनी करितों तव जयकार
आगमनीं तव किती वाहिले नव रक्ताचे पूर
वाहिले नव रक्ताचे पूर

स्वातंत्र्याच्या संगरांत किति सुपुत्र पडले शूर
हिंदचे सुपुत्र पडले शूर
तुझ्या दर्शनासाठीं झटतां खपले किति झुंजार
आमुचे खपले रणझुंजार
काळाचे किति गळ्याभोंवतीं पडले हात कठोर
मृत्युचे पडले हात कठोर
त्या वीरांना स्मरुनी हृदयीं करितों मी निर्धार
आज मी पवित्र करि निर्धार
प्राणपणानें तुझ्या निशाणा गौरवार्थ लढणार
तुझ्या मी गौरवार्थ लढणार
रक्षाया दिव्य निशाण
हिंदचा मान-अभिमान
सर्वस्व करिन बलिदान
धजतां कुणीं
ध्वज मानभंजना
करीन मी प्रतिकार
करिन मी प्राणबळें प्रतिकार
निशाणा, करितों तव जयकार

* * *

## घे निशाणा वंदना

भारताचा दिव्य झेंडा डोलतो वाऱ्यावरी
हिंदभूच्या गौरवाचा लेख रंगे त्यावरी.
भारताच्या भाग्यरेषा त्यावरी घ्या पाहुनी
कष्टदुःखें संपलीं तो सांगतो उल्हासुनी.

देशभक्तांची मनीषा या स्वरूपीं रंगली
पूर्वजांची पूर्वपुण्याई फळाला पातली.
मोचनीं श्री भारताच्या रक्त ज्यांनीं सांडिलें
राष्ट्रकार्यीं हासुनीयां देह ज्यांनीं अर्पिले.

दीर्घ केले यत्न ज्यांनीं यातना आमंत्रुनी
सार्थ झाले ते युगांचे कष्ट त्यांचे या दिनीं.
पातले ते पुत्र सारे भारताचे अंबरीं
नेत्र झाले तृप्त त्यांचे हर्षले ते अंतरीं

प्राण गोळा जाहले डोळ्यामधीं त्वद्दर्शना
प्रेमभावें, भक्तिभावें घे निशाणा वंदना.

( १५ ऑगस्ट १९४७ )

* * *

# गाई रणगीत

गाई रणगीत — सखे ग
उत्साहें सळसळेल तनु-मन
गा असलें गीत

मुलें, फुलें अन् तारा यांचें सुमधुर संगीत
ऐकुनि रमलों कल्पनेंतल्या भ्रामक सृष्टींत—सखे ग,

मी तूं दोनच इथें माणसें असल्या धुंदींत
जगास विसरुनि, गुंग जाहलों अधर-सुधा पीत—सखे ग.

सौंदर्यावर सौंदर्याचा भक्त करी प्रीत
रूपाविण नच त्याच्या कांहीं भरले दृष्टींत—सखे ग,

स्वर्ग-अप्सरा-सुधा स्वर्गिचा गोड पारिजात
खुळें हृदय हें रमलें भ्रामक तत्सहवासांत—सखे ग,

* * * *

मधुर कल्पनेवांचुनि नव्हतें कांहीं माहीत
दृश्य आजचें कर्तव्याचें हृदया भिववीत—सखे ग,

कोकिळगाणीं ऐकुनि बनलें काळिज नवनीत
रणदेवीचा तीव्र सूर हा त्यास वितळवीत—सखे ग,

हृदय गुंगलें तुझें ऐकुनी गोड भावगीत
रणशिंगें खणखणतां आतां होतें भयभीत—सखे ग,

* * * *

दुबळया हृदया संजीवन जें पाजिल संगीत
गा असलें रणकर्कश सखये, आतां रणगीत—सखे ग,

ज्या गीताचे सूर सखे ग, शिरतां कानांत
चैतन्यानें फुलेल कणकण नवथर देहांत—सखे ग,

रणांगणाचें दृश्य भयानक भरतां दृष्टींत
थिजेल नच ती 'श्रेय हरपलें' राहिल शोधीत—सखे ग,

उत्साहाचें खेळवील जें वारें हृदयांत
गा असलें रणकर्कश सखये, आतां रणगीत—सखे ग,

कल्पनेंतली सृष्टि वितळुनी जाइल निमिषांत
गा असलें रणकर्कश सखये, आतां रणगीत—सखे ग,

धुंद होउनी रणचंडीच्या तांडव नृत्यांत
नाचाया मन धांवत जाइल गा असलें गीत—सखे ग.

सखे ग, गाई रणगीत
उत्साहें सळसळेल तनु—मन
गा असलें गीत

* * *

# हाक

ही हाक ऐकुनी मानवतेची कोणी—
हा साद महात्मा घाया ये धावोनी.

कळुनिया वेदना हृदयाची हृदयाला
तो हाक देतसे साऱ्या मानवतेला.
ही हाक मारुनी उत्कंठित हृदयानें
पाहतों भोंवतीं भिरभिरत्या नयनानें.

नयनांत जाहले प्राण सर्वही गोळा
घन-तिमिरीं कांहीं दिसे न जरि दृष्टीला
ज्या नयनीं शिरला संपत्तीचा धूर
दारिद्र्य तयांला कसें कुठुनि दिसणार ?

घनघोर गर्जना तोफांची ऐकून—
जे एकसारखी सरावलेले कान
ही हाक आंतल्या कोमल आवाजाची
कां ऐकाया त्या येइल मानवतेची ?

तरि हाक मारतों विमूढ बनल्या हृदया
झटतसे तयाला प्राणबळें उठवाया.

वाटली हाक ही जर दुबळ्या हृदयाची
तर चुकाल, येइल पाळी अनुतापाची.

ही हाक न दुबळ्या हृदयाची जगताला
आव्हान असे हें साऱ्या मानवतेला.

* * *

## उडी घेण्यापूर्वि

येउनी कोणीतरी गे
घेतला हा हात हातीं
आणि जन्मोजन्मिचा तो
जीवनाचा होय साथी.

जाहलाना ओळखीचा
सोडुनीया तोंच जाई
दोष माथीं सर्व माझ्या,
मी करंटी मात्र होई.

पाखडोनी आग सारे
पाहती जाळावयाला
पाहुनी तो अश्रु गाळी
धीर दे कष्टी मनाला.

वाटला विश्वासमूर्ती
अर्पिलें सर्वस्व त्याला
फायदा घेऊन देवी,
तो गळा कापून गेला.

बापभाऊ पाहतीना
जाहलें जें तोंड काळें
प्रेमदेवी माय मानी
'मी न कां पूर्वीच मेलें'

कोसळे आकाश माथीं
 विश्व पाही खावयातें
ना मिळे आधार कोठें
 दीन पापी या जिवातें.

पापराशी जीव दुःखी
 या जगानें टाकलेले
घेतले पोटांत जे जे
 आश्रयाला देवि, आले.

मायगंगे, तूंच आतां
 एकली आधार जीवा
गांजलेला जीव घ्याया
 ये तुझ्या पोटीं विसावा.

* * *

## समाधान

[ अलौकिक ध्येयनिष्ठ व्यक्तीची धडपड पाहून हसणाऱ्या सामान्यांना याशिवाय ती व्यक्ति काय उत्तर देणार ? ]

दूर ग्रहांवर ठेवुनि दृष्टी
कां धडपडतों, होतों कष्टी
कां उलथाया बघतों सृष्टी ॥
कसें तुम्हाला पटवुनि द्यावें
हृदयामधलें काहूर.

म्हणतां " मिळतें अन्न घासभर
पाणी प्याया असे घोटभर
व्यर्थ कशाला मग ही कुरकुर "
भूक आमुची किती युगांची
शमे न खाउनि चतकोर.

दिसे जरा ही हिरवळ येथें
बघतां तुमचें मन विसावतें
इथें रमावें तुम्हां वाटतें
अफाट अमुची नजर फांकली
कशी इथें ती ठरणार ?

दूर दूर जरि नंदनवन तें
तरी लागला ध्यास जिवातें
मना न दुसरें कांहीं रुचतें
गांठायाला स्वप्नसृष्टिला
प्राणपणानें झटणार.

जरी वाटती तुम्हांस सारे
हवेंतले हे उंच मनोरे
कल्पनेंतले सुरम्य तारे
बघतां फुलतें हृदय आमुचें
हर्षोन्मादीं हो चूर.
दुर्दम-आशा-उत्साहानें
तुडवित जातां भयाण रानें
अडेल पाउल कां भीतीनें ?
डोंगरमार्गीं उभे राहिले
तरिही धांवत जाणार.
ओढ लागली जी हृदयाला
कळेल नच ती कधीं तुम्हांला
व्यर्थ झटुं नका अडवायाला
पंथ आमुचा असे निराळा
मार्गावरुनी व्हा दूर.
अगम्य लागुनि ओढ जिवातें
आगींत सती हांसत शिरते
दूर लोटुनी प्रिय बाळांतें—
कधीं सतीचें वाण सतीविण
इतरांना कां कळणार ?
जरी धांवतां फुटेल छाती
दुबळ्या तनुच्या थिजतिल शक्ति
सर्व श्रमाची होइल माती
मिळेल मरतां समाधान तें
तुम्हां कधीं नच मिळणार
नच — मोल तयाचें कळणार.

* * *

## शेवटचा मुजरा

कशाला मोह गडे पाडिशी ?
हृदयांत पसरली अवस दिसावा तेथ कोठुनी शशी !

कशाला भ्रमवितेस मोहिनी ?
बेताल भडकतो मनोवारु तव मधुर भाव पाहुनी

तुझा हा मुग्ध भाबडेपणा
येतांच अनुभवा एकसारखी तळमळ लागे मना

फुले तव तारुण्याची कळी
एकेक तियेची मम सहवासीं गळेल गे पाकळी

सुगुण तव रूपानें प्रगटले
मातींत माझियासवें मिसळतिल, कां न तुला हें कळे ?

भासतें नंदनवन जग तुला
ओसाड सहारा रखरखणारा भासे भंवतीं मला

तुझ्या नव हृदयोद्यानांतले
सद्भावतरूंचे करपतील गे अंकुर नव कोवळे

बहरल्या तुझ्या भावना गडे.
मधुभाव करपले हृदयांतिल मम दुःखें मानस रडे

अमृतमय स्पर्श तुझा बालिके,
कोळसा होतसे रत्न करीं जरि मीं धरिलें कौतुकें

शिंपला सेक सुधेचा जरी
कां प्रेम लतांकुर उगवायाचा काळ्या दगडावरी

भोंवतीं सुमनांचा जरि सडा
ओकते गरळ गे प्राणांतक तरि जहरी नागिणफडा

सदा कटु अनुभव माझा असे
सहवासीं माझ्या कधीं कुणाला सुख नच लाभतसे

रूप–गुण दिव्य जयाचे भला.
सांजेल युवक बघ असाच
मुजरा शेवटचा घे तुला.

* * *

## नवा बंडवाला

( Bee कवींचा बंडवाला आज कोठून दिसेल ? )

" बोल हिताचे तुला सांगतों, समजुनि हृदयांतरीं
चांगला विचार बाले, करीं.

व्यर्थ होम तूं आयुष्याचा करूं नको सुंदरी
भावना-वेग जरा आवरीं.

क्षणिक भावनाभरांत माझ्या करांत कर देशिल
पुढें मग अनुतापें रडशिल.

सुख भोगायाला जन्म तुला लाभला,
ही सावलींतली तुझी कोंवळी कळा,
आम्हांस लागती सदा उन्हाच्या झळा "

हळुच सखी गातसे " वाहिलें हृत्सुम चरणांवरी
कशाला विचार मज हा तरी ? "

" विद्यालंकृत नाजुक—साजुक तूं धनिकाची सुता
बालिके, राजमान्य तव पिता

मखमालीचा मृदुल गालिचा बोचे तुझिया पदा
धांवतों दगडखड्यांतुनि सदा

स्पर्श जयाचा तुला खुपावा ' जाड सुताडें ' असें
आमुच्या अंगावरि खुलतसे

साठला पुष्परस तुझिया हृदयांतरीं
आमुचें हृदय हें काळ्या दगडापरी
फसशील देउनी हात आमुच्या करीं "

परी सँखी गातसे " वाहिलें हृत्सुम चरणांवरी
कशाला विचार मज हा तरी ? "

" विद्यादेवी पूजायाला वेळ अम्हांला नसे
आमुचा मार्ग भिन्न राजसे

मायभूमिचे दास तिच्याविण सत्ता अमुच्यावरी
मान्य नच दुसऱ्याची क्षणभरी,

गुलामगिरिचें अवजड जोखड तिचिया मानेवरी
फेकुनी द्याया झटतों दुरी,

हा महाल जग तव, अनुभव तुजला नसे,
पांचवीस अमुच्या दुःख पूजिलें असें,
वनवास नशीबीं खडतर लिहिला दिसे. "

तरिहि सखी गातसे, " वाहिलें हृत्सुम चरणांवरी
कशाला विचार मज हा तरी ? "

" सुकी कोरडी कशीहि चाले आम्हांला भाकरी
अडेना नच वेळेवर जरी.

ध्येयासाठीं कधीं धांवतों नांव-गांव बदलुनी
सारखें सैरावैरा जनीं.

सुज्ञ बोलती ' नशिवीं लिहिलें काळें पाणी तरी '
ऐक तें नीट जरा सुंदरी,

हो आप्त मंडळी सर्व अम्हां पारखी.
तलवार लटकते माथ्यावर सारखी.
होशील धरुनि हा हात कशी तूं सुखी ?"

तरी सखी गातसे " वाहिलें कुसुम चरणांवरी
कशाला विचार मज हा तरी ?"

" राजद्रोही, अत्याचारी असा कपाळावरी
आमुच्या शिक्का बघ सुंदरी,

अचुक गांठुनी दावायाला हवा तुरुंगांतली
पाहते अधिकारी मंडळी.

हिंस्र पशूपरि कधीं आमुची करावया पारध
शिपाई धावतात सायुध.

दारांत मृत्युच्या एक पाय गे, पडे
फासांत मान बघ आंवळलेली गडे,
सुख–भोगाचे सखि, असे अम्हां वावडें "

तरिहि सखी गातसे " वाहिलें कुसुम चरणांवरी
अम्हांला विचार कां हा तरी ?"

" उलटें काळिज असे, जळाले कोमल भावांकुर ?
तुझा कां जीव येतसे वर.

मृत्युबरोबर विहरायाचें नको करूं साहस
जळोनी जाइल तनु राजस.
तळहातावर शीर घेउनी आम्ही फिरतों सदा
कशाला इच्छितेस आपदा ?

खेळतों मृत्युच्या आम्ही मांडीवरी
नच आशा होइल 'सहवासा'ची पुरी
कर धरण्याचें नच भलतें साहस करी"

तरिहि सखी गातसे "वाहिलें हृत्सुम चरणांवरी
अम्हांला विचार कां हा तरी ?"

* * *

## हृदय-गीत

कुणाचें जीवनाधारा
हृदीं संगीत नादावें ?
तुझ्यावांचून प्राणेशा,
कुणाचें गीत मीं गावें ?
पुढें अंधार पाहोनी
त्यजावा प्राण जों वाटे
उषा तों रम्य आशेची
कुणीं हो दाविली मातें ?
शिरीं आघात होवोनी
लता ही कोसळे खालीं
न कोणी सांवराया ये,
कुणाला तों दया आली ?
तुटोनी भाववीणा ही
पडे बेसूर होवोनी
प्रिया, सांगा तिच्या तारा
प्रयत्नें जोडिल्या कोणीं ?
गळा फासांत पाहोनी
दुरूनी विश्व हें जाई
तदा तो सोडवायाला
दयाळू कोण हो येई ?
तुटोनी भावनामाला
मणी जों सांडले राया,

कुणीं ती गुंफिली सांगा
मणी गोळा करोनीया.
मनाचा कोळसा केला
जगानें आग लावोनी,
हिरा त्याचा करी माझा
गुणी शास्त्रज्ञ विज्ञानी.
दिला आधार हाताचा
पुढें केली तुवां छाती,
तिथें हा ठेवितां माथा
मिळे जीवास विश्रांति.
भरे विश्वांत रे माझ्या
तुझी ही एकटी मूर्ति
तुझ्यावांचून कोणाचें
स्फुरावें गीत रे चित्तीं
प्रभूचें नाम कां घ्यावें ?
तयाचें रूप कां ध्यावें ?
कसें मीं त्यास जाणावें ?
तयाचें गीत कां गावें ?

* * *

## लपंडाव

लपंडाव कुठवर असला सांग चालणार,
मुग्धभाव सांग तुझा हा, कधीं संपणार.
प्रीतिपुष्प सुमधुर पसरी भोंवतीं सुगंध,
मृदुलकरें हसवी डुलवी हृदयवात मंद,
प्रेमभरें संनिध यावें होउनिया धुंद,
तोंच लपे होई पानाआड दृष्टिपार.
वसंतांत खुलती लतिका सुनव पल्लवांहीं
देहवेल तेंवि नटे जों दृष्टभेट होई;
परि निकट येतां भलतें नवलदृश्य पाहीं
क्षणीं लाजवंतीसम हो मुग्ध पर्णभार.
गूढभाव कवनांतिल मम सांगुनी दुजांला
गाउनिया गीतें माझीं रमविसी स्वतांला,
भासविसी मात्र मला कीं ये न गावयाला.
सूरसुधा सांग मला गे, कधीं पाजणार.
गुंफुनिया हार फुलांचा रोज कुशलतेनें,
सजवितेस चित्रें कां हीं शून्य भावनेनें,
श्रम न गडे, चित्रासाठीं ? हृदय मीच जाणें
सांग कधीं कंठीं मम तो घालणार हार.
ओळखुनी हृदयें झालीं जरी एकजीव.
परस्परास्तव आपण ना ? नसे भिन्नभाव,
खेळतेस लटका मग कां असा लपंडाव ?
हांस, बोल, गाई, चल ये गळा मिठी मार.
लपंडाव कुठवर असला सांग चालणार !

* * *

## रजनीसखी

Though darkness comes
Evening is always bright
A. Gwiu.

सरतां निशा खुलती दिशा, हंसते उषा गगनांगणीं
सुख द्यावया जगता, सुधा रविराज ये करिं घेउनी.
जग सर्व त्या करि वंदना, उदयाचलीं बघतां क्षणीं.
रविदर्शनें मम अंतरीं, पसरे निशा तम दाटुनी.

अरुणोदयीं मज सोडुनी, निघतो सखा मम जावया
पडती तया श्रम सारखे, तनु-जीव हे जगवावया.
झटतो तिथें क्षण मोकळा, नच एकही मिळतो तया.
जळतें इथें विरहानलीं, क्षण मोजतें दिन जावया.

हृदयेश तो सदनास ये, रवि लोपतां परतोनिया
दुरुनी तया बघतां क्षणीं, पद धांवती कवळावया.
थकुनी सखा गृहिं येतसे, झटतें श्रमा शमवावया
करपाश मी मग घालतें, विरही जिवा सुखवावया.

गगनामधें करि शासना, रजनीसखी मम जोंवरी
हृदयेश्वरा मम न्यावया, कुणि शक्त ना दुरि तोंवरी
पसरे निशा भंवतीं तशी, उजळे उषा हृदयांतरीं
रजनीसवें तम ये, सदा परि उज्ज्वला मम शर्वरी.

* * *

## धिक् जीवन !

A poor life this, if full of care
We have no time to stand and stare.
W. H. Davies.

काय अर्थ जीवनांत नित जें कार्यमग्न राही
जर सौंदर्यानंद घ्यावया विश्रांति-क्षण नाहीं.

* * *

प्रातःकालीं गुलाल उधळित रविराया येई.
संध्यारंगीं मेघ रंगवुनि दावी चतुराई.
धनी जगाचा नील गालिचा अंगणांत पसरी,
निशासमयिं तो दौलत त्यावरि करि उघडी सारी.
खुले वनश्री रंगसंगती देवाची दावी,
रंग-रूप-मधु-गंध फुलांचा मना वेड लावी.
निर्झरतीरीं फलपुष्पांनीं बहरे वनराई,
तरुशिखरावर बसुनी मंजुळ विहंगगण गाई.
देवाघरची दौलत दावी हें निर्झरपात्र,
भर माध्यान्हीं पाहतांच जी सुखावती नेत्र.
वनांत दिसती हरिण-बालकें स्वैर नाचतांना.
कुठें आढळे चंचल लहरी खार खेळतांना.
वारा पिउनी उडे वासरूं हें गोजिरवाणें,
क्षण लावुनि टक, गुरें पाहती टाकुनिया खाणें.
हा उन्मादक रूपवतीच्या विलास नयनांचा,
नाच चालतो सदा तियेच्या नवथर देहाचा

स्मित गालांतिल सदा पहावें विस्मित होऊनियां,
रंग देउनी केतकिचा विधि नटवी मृदुकाया.
सर्व जगाला नमवी पायीं भ्रूधनुची लीला,
मुखचंद्रानें भरतें येतें भावसागराला.

* * *

सौंदर्याचीं दृश्यें देती निर्मल आमोद,
क्षणहि मोकळा ज्यास मिळेना घ्याया आस्वाद.
जरि असला विद्वान–धनिक–गुणि–नरवर–सम्राट,
जरी थोरवी गातां त्याची थकले कविभाट.
व्यर्थ कीर्ति-धन-सत्ता वाटे, व्यर्थ जिणें त्याचें,
न मिळे घ्याया क्षण दर्शनसुख जर सौंदर्याचें.
व्यग्र सदा, नच फुरसत ज्याला जीवनकलहांत,
'धिक् जीवन' नच कुणी अभागी त्यासम जगतांत.

***

# आळवणी

किती करूं आळवणी
कधीं येशिल साजणी
जीव पाहे उत्कंठूनी
वाट तुझी.

नित्य तुझी कृपादृष्टि
आनंदाची करी वृष्टि
रम्य दाखविते सृष्टि
प्रेमभरें.

दिव्य तुझी प्रेमरीति
सर्वस्वाची हो विस्मृति
मोहरून जाई वृत्ति
सहवासीं.

देई त्वरें आलिंगन
पाज जीवा संजीवन
पाश कोमल टाकुन
झणी कंठीं.

शय्या कुसुम–कोमळ
परी खुपे उरीं शूळ
करी विरह–व्याकुळ
जीवाला ते.

पाश तुझा कंठीं पडे
क्षण दिव्य भासे गडे,
डोळे तुझ्या वाटेकडे
लागले गे.

आणी डोळ्यांमध्यें प्राण
तुझ्या विरहाचा क्षण
एक एक गे, मोजुन
जीव शिणे.

दिव्य टाकुनी मोहिनी
विश्व टाकिसी भारुनी
जासी मज कां टाळुनी
निद्रादेवि ?

★ ★ ★

# भांडवल–शाही

( भांडवलशाहीवर तीव्र प्रहार करणाऱ्या एका साम्यवादी तरुणीस– )

हातामध्यें उंच उभारुन झेंडा समतेचा
सांगतेस संदेश जगाला दिव्य विचारांचा
“ धनिकाचें जग सर्वांवर तें चालवितें सत्ता
धनांध होउनि मत्त मारिती दुबळ्यांला लत्ता.
संपत्तीची विषम वांटणी दुःखाचें मूळ
प्रमत्त धनिकां चिरडुन टाकूं, चारूं या धूळ.
जगीं भांडवलशाही सारीं दुःखें निर्मितसे
पहा कशी बेताल स्वैर ही लक्ष्मी नाचतसे.
निर्धन जनता पोटासाठीं बनते असहाय
होउनिया लाचार भजतसे धनिकांचे पाय.
परि न यापुढें तोरा त्यांचा चालूं देणार
हीन दीन बनवून तयांला पदीं नमविणार. ”
सांगतेस तळमळुन जगाला समतेचा मंत्र
आढळतें परि आचरणीं गे, तव न्यारें तंत्र
मुळीं भांडवलशाही असशी तूंच मूर्तिमंत
जाणसी न कां कसें करिशि तूं जग पादाक्रांत ?

*　　*　　*

नयमनणी तेजाळ तुझे हे लखलखती दोन
रत्न दिव्यतर दिसेल कोठें जगांत त्याहून ?

तेजस्वी जरि जगीं माणकें, प्रवाळ बहुमोल
काळवंडती लाजुनि, बघतां अधर तुझे लाल.
अधरसंपुटीं लपलेल्या ह्या मोत्यांच्या माळा
दिव्य कांतिनें उजळतात गे साऱ्या जगताला.
हसुन डोलती जों न तरुलता तोंच सुमनसृष्टी
मलूल होते जगांतली या होतें मन कष्टी.
यौवन–उपवन बहरतांच तव 'सदाफुली' फुलली
गुलाब, कमळें, चांफा–हसऱ्या सुमनांनीं नटली.
एकच वेली तऱ्हेतऱ्हेचीं फुलें गडे, फुलती
काय स्वर्गिच्या कल्पतरूची तिच्यापुढें महती.
रूपसंपदा उघड्यावर ही खेळतसे खेळ
दृक्क्षेपानें बघणाराला करिसी घायाळ.
रत्नकोश हा खडा पहारा रक्षितसें द्वार
सज्ज भ्रूधनू, चाले त्याचा सदा टणत्कार.
भांडवलावर अमोल या तव रमणी अधिकार
कुबेरगृहिचें तुच्छ त्यापुढें सारें भांडार.
भांडवलावर याच तुझा गे, चाले व्यापार
धीमान्, बलवान् युवकहि होई तव पर्दि लाचार.
कटाक्षमात्रें तुझ्या नाचतो होउनि बेताल
उत्सुक मुखिचा झेलाया तव शब्द सर्वकाल.
अतुल रूप तव, तुझें भांडवल, लोळण पदिं घेई
बलें तयाच्या उभ्या जगाला नमवितेंस पायीं.
तुझी ' भांडवलशाही ' चालवि जगांत अधिकार
सांग जगांतुन नष्ट कधितरी का ती होणार ?

* * *

## कैफ—

देशास — दिव्य इतिहास – आमुच्या खास
लाभेल तसा नच कधिकाळीं इतरांस.

झुंझार — मर्द रणवीर – देउनी मार
पळविती रिपूंचे कसलेले रणधीर.

तलवार — तिखट बहु धार – बसे ज्या वार
धरि क्षणांत रस्ता परलोकाचा वीर.

जन्मले — नरमणी भले – वंद्य जाहले
विश्वास आमुचें राष्ट्र थोर हें असलें.

पांडित्य — धर्म-नय-सत्य – नांदलें नित्य
देशांत दिव्य या थोर आमुचें भाग्य.

देवता — गुणालंकृता – जया पाहतां
निमिषांत झुकतसे दुष्टांचाही माथा.

अभिमान — करी बेभान – ताठ हो मान
फुरफुरते छाती, स्फुरतें हृदयीं गान.

गाउनी — वीर सति गुणी – आज निशिदिनीं
ताठ्यानें म्हणतों श्रेष्ठ अम्ही या भुवनीं

बेताल — बोलतों बोल – सर्व परि फोल
कवडीचें फुटक्या नसे तयांचें मोल

नावरे — कैफ जो भरे – वृत्ति बावरे
तोंडांतुन सुटती शब्दांचेच फवारे.

* * *

## हा हिंददेश माझा

अति हीन दीन ऐसा — हा हिंददेश माझा,
सत्यास ठाव नाहीं,
वृत्ती न ठेवि न्यायी,
फितुरीस मानि राजा — हा हिंददेश माझा.
शुक, जानकी, शिवाजी,
श्रीकृष्ण, सिंह, गाजी
नांवांत खूष समजा — हा हिंददेश माझा.
जगदीश जन्मुनीया,
करि यत्न उद्धराया,
परि दास्यपंकिं ऐसा — हा हिंददेश माझा.
गाऊन पूर्वजांला,
गणिं थोर हा स्वतांला,
करितो गुलाम मौजा — हा हिंददेश माझा.
बेताल बोलतांना
होतात ताठ माना,
फुटकाच कीर्तिबाजा — हा हिंददेश माझा.
जगिं त्याविना कुणीही
नादान अन्य नाहीं,
म्हणतोंच थोर समजा — हा हिंद देश माझा.
जरि हीन-दीन लोकीं
गर्जू मुखें परी कीं,
थोरांत थोर समजा — हा हिंददेश माझा.

* * *

## ठावा न सुखाचा वारा

( तांबेभक्तांनीं सदय अंतःकरणानें क्षमा करावी. )

जिवलगे, संगिं तव सारा,
खर्चाचा मात्र पसारा,
जुंपलों सदा संसारा,
ठावा न सुखाचा वारा.
सांखळी, सरी, पाटली
जरीं तुज दिली,
मागणी हारा,
ठावा न सुखाचा वारा.
पैठणी, पातळें जरी
दिलीं, बघ शिरीं,
ऋणाच्या भारा,
ठावा न सुखाचा वारा.
कितितरी आणिले शालु,
तरी नव घालुं,
हौस अनिवारा,
ठावा न सुखाचा वारा.
पुरवितां न ये जों अर्जी
जातसे मर्जि,
कार्णि विषधारा,
ठावा न सुखाचा वारा.
तुज दिलें सर्वही जरी,
दास, पद धरी,
तरी तिटकारा,
ठावा न सुखाचा वारा.

* * *

[stamp]

## काव्यगंगा

[ संसृतीच्या उन्हाळ्यानें जिवाची तल्खली होत असतां पाणपोईंतील चुळूकभर पाण्यानें व्याकुळ जीव शांत कसा होईल ? त्याला गंगेच्या डोहांतच बुडविलें पाहिजे. ]

येइ भाई, येथ पाही काव्यगंगा वाहते ही,
वाचका ये, धर्मजाती भेद खोटा येथ नाहीं.
संसृतीचा हा सहारा, वाहतो अत्युष्ण वारा,
तल्खली होई जिवाची, रे उरेना त्राण देहीं.

येइ भाई, येथ पाही, काव्यगंगा वाहते ही,
शांतवाया तप्त जीवा याविना बा स्थान नाहीं.
पूर्वी झालेल्या कवींचीं, वाचुनीया रम्य काव्यें,
कल्पना चोरीं कुणाच्या अन् कुणाचे शब्द घेई.
दाखवी भागीरथी दीर्घा तपश्चर्या करोनी,
तप्त जीवा शांतवाया हा पहा गंगौघ येई.
संसृतीचा हा उन्हाळा, तल्खली होई जिवाची,
येउनी स्वच्छंद पोहीं, काव्यडोहीं ना मनाई.

भावरंगीं गुंगवी चोरी करोनी वाचकांला,
सांगतों माझेंच सारें हीच माझी कारवाई.

० ० ०

पाहुनी उच्छिष्ट सारें वाचका, संतापुनी तूं,
ज्या शिव्या देशील मातें, तेवढी माझी कमाई.

* * *

# परिशिष्ट

[ हलीं चाली देणें पुष्कळांना आवडत नाहीं. पण एखाद्याला आवश्यकता वाटलीच तर...हें चालींचें दिग्दर्शन आहे. ]

| कवितेचें नांव | | | चाल, वृत्त, छंद वगैरे |
|---|---|---|---|
| फुलारी | ... | ... | जाति—दिंडी |
| मनोमुरली | ... | ... | चाल—नृपकन्या तव जाया |
| भक्तिभाव | ... | ... | जाति—भूपतिवैभव |
| अर्पण | ... | ... | ,, |
| पूजनोत्सुक | .... | ... | ,, |
| विठ्ठल | ... | ... | ,, |
| हाक | ... | ... | ,, |
| चंचल कृष्ण | ... | ... | चाल—जन सारे मजला |
| घुमवी कुंजवना... | | ... | चाल—आजि म्यां ब्रह्म पाहिलें |
| प्रीतिनें चुंबि...परि | | ... | जाति—केशवकरणी |
| शिकार | ... | ... | ,, |
| नव युवती | ... | ... | तिलंग—धुमाळी |
| गानदेवतेस | ... | ... | चाल—मज गमे ऐसा |
| मुग्धेस | ... | ... | ओवी औटचरणी |
| रूपांतर | ... | ... | जाति—दिंडी |
| चित्तचोर | ... | ... | जाति—श्यामाराणी |
| रंग पहा आंतला | | ... | चाल—फेऱ्या दारावरी |
| अर्पी तनु त्या नरा | | ... | ,, ,, |
| सांगतेस का मला ? | | ... | ,, ,, |
| उघडुनि दावूं कसें | | ... | ,, ,, |
| बोलूं दे नयना ... | | ... | चाल—आजि म्यां ब्रह्म |
| लाजली पोर | ... | ... | चाल—असा धरि छंद |
| कसेसें आज कां व्हावें ? | | ... | चाल—असे पति देवचि |
| थांब जरा सुंदरी | | ... | चाल—फेऱ्या दारावरी |

| कवितेचें नांव | चाल, वृत्त, छंद वगैरे |
|---|---|
| तुवा बद्ध केलें ... ... | जाति–शारदा |
| परिहास ... ... | चाल–यमुनातटिं राम खेले |
| उणीव ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| जाशिल का ? ... ... | चाल–तूं माझा यजमान |
| दर्शनानंद ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| कलहाची मधुरता . | ,, |
| म्हणून ! ... ... | जाति–नववधू |
| कुणी पाहिल ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| फुलपांखरूं ... ... | जाति–श्यामाराणी |
| मनीषा ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| ललाटलेख ... ... | ,, |
| उन्मत्त भूपतीस ... ... | चाल–आजि म्यां ब्रह्म |
| इशारा ... ... | भूप–झंपा |
| मदांधास ... ... | विभास–झंपा. |
| समर्पण ... ... | जाति–नववधू |
| दिवाळी ... ... | ,, |
| पंख छेदलेल्या पांखरास ... | चाल–तरुण कुलिन गोरा |
| मृत्यूस ... ... | जाति–कोकिळा |
| वियोगिनी ... ... | वृत्त–वियोगिनी |
| दयाघना ... ... | चाल–तुझ्या बाळमुकुंदें |
| सांग मला बाई ... | अंजनीगीत |
| अंधारांतील घाव ... | जाति–मुद्रिका |
| हृदयवीणा ... ... | जाति–दिंडी |
| तेव्हां आणि आतां ... | वृत्त–वारुणी |
| प्राणसंकटांत ... ... | जाति–शूर्पणखा |
| वंचित ... ... | वृत्त–मदालसा |
| विसरुनी जातें ... ... | चाल–आनंद कंद ऐसा |
| न कळे कांहीं ... ... | चाल–असा धरि छंद |

| कवितेचें नांव | चाल, वृत्त, छंद वगैरे |
|---|---|
| फेट ... ... | जाति–दिंडी |
| जगाचा शिक्षक ... | भूपाळी |
| सौंदर्य व रसिकता ... | जाति–दिंडी |
| दग्धहृदय ... ... | भूपाळी |
| लोटेल परी काळ असाही ... | जाति–शामाराणीप्रमाणें |
| दृष्टिकोन ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| वेणु वाजेना ... ... | चाल–कांहीं कळेना |
| आशादेवि ... ... | जाति–दिंडी |
| प्रीतीचा पाश ... ... | वृत्त–शार्दूलविक्रीडित |
| दावा प्रेमनिवास ... | चाल–तूं माझा यजमान |
| हृदय भग्न झालें ... | जाति–दिंडी |
| पांखरास ... ... | जाति–नववधू |
| प्राणविसांवा (१) ... | चाल–मी नवन्नाला |
| ,, (२) ... | ,, ,, |
| प्रथम दर्शन ... ... | जाति–नववधू |
| हृदय तुझें खोल ... | चाल–राधे कृष्ण बोल |
| चुकविसि कां तूं मला ? ... | चाल–थांब जरा सुंदरी |
| पाहूं नको हें असें ? ... | ,, ,, |
| दाव आपुली कळा ... | ,, ,, |
| ठेव दूर वीणा ... | जाति–शारदा |
| साशंक ... ... | जाति–नववधू |
| समाश्वासन ... ... | ,, ,, |
| विपर्यास ... ... | ,, ,, |
| सांत्वन ... ... | चाल–सोन्याची घेउनि |
| विनवणी ... ... | जाति–केशवकरणी |
| दावी दिलदारी... ... | वृत्त–रात्रवितान |
| याचना ... ... | जाति–शारदा |
| कुसुमायुधास ... ... | जाति–नववधू |

| | | |
|---|---|---|
| जाहले...परी ... | ... | जाति—केशवकरणी |
| प्रीति ... | ... | वृत्त—शार्दूलविक्रीडित |
| सहज मग! ... | ... | जाति—केशवकरणी |
| तुझें सामर्थ्य ... | ... | जाति—नववधू |
| मोहिनी ... | ... | चाल—उघडि नयन रम्य उषा |
| वाटते...दुरी ... | ... | जाति—केशवकरणी |
| करपलेल्या कळीस | ... | चाल—उघडि नयन |
| काळरात ... | ... | चाल—मशिं बोलुं नको गोविंदा |
| कां रडसी विभ्रमांत? | ... | ,, ,, ,, |
| जादुगार ... | ... | चाल—उघडि नयन |
| कटु अनुभव ... | ... | जाति—भूपतिवैभव |
| योगिनी ... | ... | जाति—नववधू |
| निर्धार ... | ... | चाल—तूं माझा यजमान |
| घे निशाणा वंदना | ... | वृत्त—वल्लभा |
| गाई रणगीत ... | ... | चाल—चंद्रकान्तसारखी |
| हाक ... | ... | जाति—भूपतिवैभव |
| उडी घेण्यापूर्वी ... | ... | वृत्त—वारुणी |
| समाधान ... | ... | चाल—स्मशानांतील गाण्यासारखी |
| शेवटचा मुजरा... | ... | चाल—वसंतीं बघुनि मेनकेला |
| नवा बंडवाला ... | ... | जाति—केशवकरणी |
| हृदयगीत ... | ... | वृत्त—वियद्गंगा |
| लपंडाव ... | ... | जाति—शारदा |
| रजनी सखी ... | ... | वृत्त—वल्लभा |
| धिक् जीवन! ... | ... | जाति—चंद्रकांत |
| आळवणी ... | ... | ओवी—औटचरणी |
| भांडवलशाही ... | ... | जाति—चंद्रकांत |
| कैफ ... | ... | चाल—कुस्करूं नका हीं सुमनें |
| हा हिंद देश माझा | ... | चाल—आनंदकंद ऐसा |
| ठावा न सुखाचा वारा | ... | चाल—जिवलगे, संगि तव सारा |
| काव्यगंगा ... | ... | वृत्त—वारुणी |

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७४७५८ वि. काव्य
क्रमांक 2006 नोंद दि. 12/3/79

REFBK-0010597